

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** www.epaper.rajyaloktantra.com

होळीच्या या पवित्र अग्नीमध्ये निराशा, दारिद्र्य, आळस यांचे दहन होवो आणि सर्वांच्या आयुष्यात आनंद, सुख, आरोग्य व शांती नांदो... –संपादक



बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३१९ | गुरूवार, दि.१३ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये



# नितीन गडकरींच्या बागेतील संत्री रामदेवबाबांच्या प्रकल्पात


## कृषि क्षेत्रात ६ वेळा डिलिट पदवीचा ही सांगितला किस्सा!


**नागपुर । प्रतिनिधी**

**माझा स्वतःचा संत्र्याचा बगीचा आहे. त्यात आम्ही जीवामृतचाही प्रयोग करत आहोत. शिवाय तिथे आम्ही ड्रोनच्या माध्यमातून फवारणी करत आहोत. आमच्याकडे इलेक्ट्रॉनिक बैलजोडी आहे, ग्रीन हाऊस आहे. आता इलेक्ट्रॉनिक ट्रॅक्टरचा ही उपयोग आम्ही करणार आहोत. शिवाय या सगळ्यात मला रुची आहे. त्यामुळे मी जास्त करून शेतकरी, शेती आणि त्या संबंधित क्षेत्रामध्ये काम करतो. आमच्या बागेतील संत्री रामदेवबाबांच्या प्रकल्पात जात असल्याचेही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. ते नागपुर येथील एका कार्यक्रमात बोलत होते.**

यावेळी नितीन गडकरी पुढे म्हणाले, रामदेव बाबाजी तुमच्या आशीर्वादाने मला







वेगवेगळ्या युनिव्हर्सिटीमध्ये ११ डॉक्टरेट पदवी मिळाली आहे आणि त्यातील ६ डिलीट मानद पदवी मला शेती या क्षेत्रासाठी मिळाली आहे. त्यामुळे मी बॅकअपमध्ये आपल्या पतंजली फूड अँड हर्बल पार्क प्रकल्पाला सर्वतोपरी मदत करेल. शिवाय माझ्या शेतातील संत्री, मोसंबी, नींबू आणि इतर सर्व फळ पान २ वर

### ड्राय पोर्ट निर्मितीमुळे बांगलादेशला डायरेक्ट संत्र्याची निर्यात

विदर्भाची संत्री बांगलादेश येथे निर्यात केली जातात. पण बांगलादेशच्या सरकारने या निर्यातीवर ८५ टक्के ड्युटी लागू केली आहे. त्यामुळे लॉजिस्टिक खर्च वाढतो आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधानांसोबत मी या संदर्भात बोललो असता, मी ड्युटी कमी करायला तयार आहे, व्याजची ड्युटी तुम्ही कमी करा, असे ते म्हणाले होते. मात्र अलीकडे आम्ही बांगलादेशसाठी नवी योजना आखली असून नागपूरमध्ये एक प्रकारे आम्ही समुद्र आणला आहे. वर्धात ड्राय पोर्टची निर्मिती केली आहे. त्यातून डायरेक्ट संत्री ही बंगालच्या हल्दीयाला जाईल आणि तिथून मग ती बांगलादेशला पोहोचेल. त्यामुळे लॉजिस्टिक कॉस्ट कमी होऊन विदर्भाच्या शेतकऱ्यांना अधिक फायदा मिळेल, असा आमचा प्रयत्न असल्याचेही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.

## पीओपी मूर्ती संदर्भात अभ्यासगट स्थापन– पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

**प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्तीमुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी विशेष अभ्यासगट स्थापन केला आहे. तसेच यासंदर्भात राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाची मदत घेण्यात येणार आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य चंद्रकांत नवघरे, वरूण सरदेसाई यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती.**

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीचे जलस्त्रोतामध्ये करण्यात येणाऱ्या विसर्जनामुळे जलप्रदूषणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशासनुसार केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पीओपी मूर्ती विसर्जनासंदर्भात नव्याने मार्गदर्शक सूचना जारी करून या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात सर्व राज्यांना निर्देश दिले होते. त्यानुसार राज्य शासनाने पीओपी मूर्ती उत्पादन, विक्री आणि विसर्जनास बंदी घातली आहे. पीओपी मूर्ती मधील प्रदूषणकारी घटक कमी करणे शक्य होईल का याची पडताळणी करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठीत करण्यात आली आहे. काही वैज्ञानिक संस्थांचे म्हणणे आहे. पीओपी मूर्तीमुळे प्रदूषण होत नाही राज्य सरकारने यासंदर्भात वैज्ञानिक पुरावे मागवले आहेत. याचा अभ्यास करण्यासाठी आयोगाकडे विनंती करण्यात आली आहे. अहवाल प्राप्त झाल्यास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे () पाठवले जातील पान २ वर

## फडणवीस, बावन्नकुळेंनी धसांना समज द्यावी-पंकजा मुंडे

# पंकजा मुंडे-सुरेश धस यांच्यातील संघर्ष टोकाला

## पंकजा मुंडेंची केंद्रीय नेतृत्वाकडे लेखी तक्रार करणार–आ.सुरेश धस

**बीड । प्रतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात महत्त्वाच्या घडामोडी घडत असताना बीड भाजपा मधला संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आणि आ. सुरेश धस एकमेकांविरोधात आता उघडपणे बोलायला सुरुवात केली असून दोघांमधील संघर्ष आता टोकाला गेल्याचे दिसते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावन्नकुळे यांची भेट घेऊन चर्चा केली असून सुरेश धस यांना समज द्यावी ही विनंती केली असल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. तर आतापर्यंत मी फक्त बोलले असून आता मी त्यांची केंद्रीय नेतृत्वाकडे तक्रार करणार असल्याचे सुरेश धस यांनी म्हटले आहे.**

गेल्या काही महिन्यापासून आष्टीचे आ. सुरेश धस आणि मंत्री पंकजा मुंडे यांच्यात संघर्ष सुरु आहे. यात धसांकडून मुंडेंवर वारंवार हल्लाबोल गेला जात होता. तर दुसऱ्या बाजूने पंकजा मुंडे मात्र गप्प होत्या. त्या मुंडे या सुध्दा आक्रमक झाल्या असून त्या म्हणाल्या, मी भाजपाची केंद्रीय पातळीवरील नेता असूनही सुरेश धस माझ्या विरोधात उघड भाष्य





करतात. मी याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष बावन्नकुळे यांच्याशी चर्चा केली आहे. या दोघांनीही धसांना समज द्यावी अशी आक्रमक भूमिका आता पंकजा मुंडेंनी मांडली. याबद्दल धसांना विचारल्यावर मी देखील पंकजा यांची तक्रार पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे करणार, असे सांगितले. ज्या विषयामध्ये कुठलाही संबंध नसताना माझ्या नावाचा उल्लेख करणं किंवा कुठल्याही टिप्पणी करणं वैयक्तिक पद्धतीने हे त्यांनी करणं अपेक्षित पान २ वर

## लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांचा गोंधळ

मुंबई : लाडक्या बहिणींची फसवणूक होणार नाही याची काळजी आमचं सरकार घेईल, असं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरेंनी म्हटलं आहे. तसंच लाडक्या बहिणींना २१०० रूपये देण्यासंदर्भातला निर्णय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील, असंही त्यांनी स्पष्ट केलं. विधानसभेत आज लाडकी बहीण योजनेवरून आमदार रोहित पवार आणि आमदार वरूण सरदेसाईंनी प्रश्न उपस्थित केले. लाडक्या बहिणींना २१०० रूपये मिळणार की नाही, असा थेट प्रश्न दोन्ही आमदारांनी सभागृहात विचारला. यावर आदिती तटकरेंनी कधीपर्यंत २१०० रूपयांचा निर्णय होईल, याविषयी मात्र स्पष्ट माहिती दिली नाही, त्यामुळे समाधान न झाल्याने विरोधकांनी सभागृहात गोंधळ घातला.

## अजितदादा पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षात बीड जिल्ह्याचा बारामतीसारखा विकास होईल

### आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली जिल्हावासीयांकडून अपेक्षा

**मुंबई । प्रतिनिधी**

**यावेळेस ना.अजितदादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षांमध्ये बीड जिल्ह्याचा विकास बारामतीसारखा होईल. अशी अपेक्षा संपूर्ण जिल्ह्यावासीयांकडून आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली. विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न सभागृहात मांडले.**



मुंबई येथे महाराष्ट्र विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे. या अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न व कामे सभागृहात मांडली. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यावेळेस ना.अजित दादा पवार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्याला ना.अजितदादांकडून अपेक्षा आहेत. ना.अजितदादांच्या पुढाकारातून येत्या पाच वर्षांत बीड जिल्ह्याचा विकास बारामतीसारखा होईल अशी लोकभावना जिल्हावासीयांची आहे. अशा शब्दांत आ.क्षीरसागरांनी ना.अजितदादांकडे पान २ वर

## धनंजय देशमुखांच्या साडूची तरुणाला बेदम मारहाण

### दादासाहेब खिंडकरवर गुन्हा दाखल होणार ; समाज माध्यमांवर व्हिडीओ व्हायरल

**बीड । प्रतिनिधी**

वाल्मिक कराडला जेलमध्ये व्हिआयपी ट्रिटमेंट दिली जात असल्याचा आरोप करणारे आणि संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांचे साडू दादासाहेब खिंडकर यांचा मारहाणीचा व्हिडीओ समाज माध्यमांवर तुफान व्हायरल झाला आहे. त्यामुळे खिंडकर गोत्यात येण्याची शक्यता असून यापुर्वी त्याच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच मुख्यमंत्र्यांना भेटालयला गेलेल्या देशमुख कुटुंबासोबत सुध्दा खिंडकर असल्याचे दिसून आले होते.

एकीकडे संतोष देशमुखांच्या निर्घृण हत्येनंतर एकीकडे देशमुख कुटुंबियांचा न्यायासाठी संघर्ष सुरु आहे. सर्व आरोपींना फाशी व्हावी या मागणीसाठी धनंजय देशमुखांसह कुटुंब पान २ वर



## मंत्रीपदाचे बांशिंग गुडघ्याला बांधून बसलेल्यांचा हिरमोड?

### धनंजय मुंडेंचं मंत्रिपद कोणाला मिळणार? अजित पवारांकडून मोठी खेळी







बीड । प्रतिनिधी

धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यावर त्यांचे मंत्रीपद बीड जिल्ह्यात दिले जाईल असे म्हटले जात होते. आ. प्रकाश सोळंके यांना याबाबत अपेक्षा लागल्या होत्या. मात्र मंत्रीपदाचे बाशिंग गुडघ्याला लावून बसलेल्या पान २ वर

## पहिली सुनावणी पुर्ण ; २६ मार्चला पुढील सुनावणी

### संतोष देशमुख खून प्रकरण; उज्वल निकम गैरहजर, कोल्हेंनी मांडली बाजू



**केज । प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्येची पहिली सुनावणी केज न्यायालयात पुर्ण झाली. यावेळी सुरक्षेच्या कारणास्तव आरोपींना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले. तर आता पुढील सुनावणी २६ मार्चला होणार आहे.

संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपपत्र दाखल झाल्यावर पहिली सुनावणी बुधवारी केज न्यायालयात पार पडली. प्रकृतीच्या कारणामुळे विशेष सरकारी वकिल उज्वल निकम हे सुनावणीला उपस्थित नव्हते. या सुनावणीदरम्यान सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे हजर होते. आरोपीच्या वकिलांनी यावेळी जबाबाच्या प्रती मागीतल्या. तसेच इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसबाबत माहिती मिळावी अशी मागणीही केली. पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११७.५० क्विंटल | २,५४० | २,९२६ | २,६३३ |
| ज्वारी/हायब्रिड :१७१.५० क्विंटल | १,८०० | ३,७०० | २,३३० |
| मका/लोकल:२०.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १२.५० क्विंटल | ६,७०० | ६,९५० | ६,८२६ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ३९.०० क्विंटल | २,५०० | ३,१०० | २,८७७ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: १०८.५० क्विंटल | ३,९२५ | ४,०११ | ३,९७२ |
| हरभरा: २९.५० क्विंटल | ५,१०० | ५,१५० | ५,१२३ |

# खोक्या प्रयागराजमधून अटक; बीड जिल्ह्यातूनही तडीपार

## उत्तर प्रदेश पोलिसांच्या मदतीने आवळल्या मुसक्या; वन विभागाने दाखल केले दोन गुन्हे

**बीड । प्रतिनिधी**

**खोक्या उर्फ सतीश भोसलेच्या बीड पोलिसांनी उत्तर प्रदेश पोलिसांच्या मदतीने मुसक्या आवळल्या असून त्याला बीड जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. तसेच खोक्याला आणखी दोन झटके बसले असून वन विभागाने सुध्दा त्याच्यावर दोन गुन्हे दाखल केले आहेत.**

सतीश भोसले उर्फ खोक्याच्या विरोधात आता आणखी दोन गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. सुरेश धस यांचा जवळचा कार्यकर्ता असलेला सतीश भोसले हा बीडच्या



शिरूर मधल्या मारहाण प्रकरणातला आरोपी आहे. त्याचे काही व्हिडिओ सामाजिक पान २ वर

### बीड जिल्ह्यातून हद्दपारीची कारवाई

खोक्यावर शिरुर कासार, पाटोदा, अंमळनेर पोलिस ठाण्यात यापूर्वीही गुन्हे नोंद होते. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या खोक्या भोसलेवर हद्दपारीची कारवाई करण्याबाबत पोलिसांनी त्याच्यावर हद्दपारीचा प्रस्ताव उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सादर केला होता. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. सतीश भोसले उर्फ खोक्याची बीड जिल्ह्यातून हद्दपारी करण्यात आली आहे. याबाबचे पत्र शिरुर कासार पोलिसांना देण्यात आले. त्यामुळे, उत्तर प्रदेशच्या दिशेने पळून गेलेला खोक्या आता बीड जिल्ह्यातून हद्दपार असणार आहे.

### खोक्या पोलिसांच्या जाळ्यात कसा अडकला?

याबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. १० तारखेला सतीश उर्फ खोक्या भोसले याने वृत्तवाहिनीला मुलाखत दिली होती. मुलाखतीनंतर खोक्या छत्रपती संभाजीनगरमध्ये मुक्कामाला होता. ११ तारखेला बीड पोलिस सतीशचा शोध घेण्यासाठी त्याच्या मागावर निघाले. त्यावेळी खोक्या संभाजीनगरमध्येच नाव बदलून एका हॉटेलमध्ये राहात होता. त्यानंतर तो तिथूनच प्रयागराजच्या दिशेने रवाना झाला. १२ तारखेला स्थानिक एसपी यांची मदत घेत बीड पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. सकाळी ८ वाजेच्या सुमारास पोलिसांनी त्याला अटक केली. आता त्याला विमानाने मुंबईत आणि तिथून रोडने बीडमध्ये आणणार आहेत.

### सहआरोपी करायला तो काय भाजीपाला आहे का?–आ. धस

खोक्याला अटक झाली ही चांगली गोष्ट असून जो चुकला तो आरोपी आहे. त्याला शिक्षा व्हायला हवी, असे सांगून आ. सुरेश धस म्हणाले, सहआरोपी करायला तो काय भाजीपाला आहे का? असे कसेही सहआरोपी होतात का?' असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

अग्रलेख

# अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्याच्या दिशेने...!

महाराष्ट्रात दोन नवीन कायदेशीर व्यवस्था केल्या जात आहेत, त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी अत्यंत घातक स्वरूपाच्या आहेत. लोकांचा आवाज दाबून टाकणार्या आहेत, त्यावरून आतापासूनच आवाज उठायला सुरुवात झाली आहे. सरकारने आता विस्तारित मीडिया मॉनिटरिंग सेंटर उघडून सर्वच प्रकारच्या माध्यमांमध्ये येणार्या बातम्या आणि कॉमेंट्सवर लक्ष ठेवून तत्काळ कारवाई करण्याची उपाययोजना हाती घेतली आहे. या मॉनिटरिंग सेंटरमधून प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडिया, न्यूज अॅप, सर्व पोर्टल्स आदी ठिकाणी जो मजकूर प्रसारित होणार आहे किंवा ज्या व्हिडिओ क्लिप प्रसारित होणार आहेत त्याचे मॉनिटरिंग केले जाणार असून या मॉनिटरिंगसाठी एक स्वतंत्र देखरेख यंत्रणा उभारली जाणार आहे. त्यासाठी दहा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, असे सांगण्यात येते. ज्या संस्थेला हे काम देण्यात येणार आहे त्या संस्थेने आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून सरकारच्या बाजूने किंवा विरोधात आलेल्या सर्व मजकुराचे अध्ययन करून सरकारला रिपोर्टिंग करणे अपेक्षित आहे.

त्यानंतर सरकार तद्अनुषंगिक कारवाई करणार आहे. त्यातून सरकारच्या विरोधात विविध माध्यमातून नुसती नाराजी व्यक्त करणारी व्यक्तीसुद्धा भरडली जाण्याची शक्यता आहे. सरकारच्या विरोधात कोणाला काहीही बोलणे यामुळे जड जाऊ शकते. कदाचित सरकारच्या विरोधात मतप्रदर्शन करणार्यांना भविष्यकाळात सरकारी योजनांचा लाभसुद्धा नाकारला जाऊ शकतो ही शक्यता नाकारली जाऊ शकत नाही. हे कमी म्हणून की काय सरकार आणखी एक अध्यादेश लागू करण्याच्या विचारात असून त्यात सरकारच्या विरोधात आंदोलन करणार्यांनाच चाप लावण्याचा स्पष्ट इरादा दिसतो आहे. 'महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक' असे गोंडस नाव देऊन ही तरतूद केली जाणार आहे. त्यात सरकारच्या विरोधात आंदोलन करणे, आंदोलनाला मदत करणे किंवा आंदोलनाचे समर्थन करणे, बेकायदेशीर संघटना चालवणे वगैरे कलमाखाली विविध टप्प्यातील कारावासाची शिक्षा प्रस्तावित आहे.

सरकारबाबत अविश्वास निर्माण करण्याचा जर कोणी प्रयत्न करणार असेल तर तो प्रयत्न हाणून पाडण्यासाठी म्हणून ही तरतूद केली जात असल्याचे सांगितले जात आहे. कुठली संघटना किंवा कुठले आंदोलन सरकारबाबत अविश्वास निर्माण करते हे ठरवण्याचे काम सरकारी यंत्रणेचे लोकच करणार आहेत. त्यासाठी पोलिसांना आणि जिल्हाधिकार्यांना हाताशी धरले जाणार आहे. वास्तविक अशा ज्या तरतुदी करायच्या आहेत त्याचा तपशील सरकारने लोकांना आधी जाहीर करून त्यावर लोकांची मते मागून घेणे आवश्यक आहे. किंबहुना त्यावर जनसुनावणी करून मगच सरकारने अशी पावले टाकणे उचित ठरणार आहे. अशा स्वरूपाच्या तरतुदी करून राज्यातल्या सर्व जनतेला दहशतीखाली घेण्याचा हा प्रयत्न आहे अशी ओरड विविध पातळ्यांवरून सुरू झाली आहे.

सरकारने जे मीडिया मॉनिटरिंग सेंटर उभारण्याचे ठरवले आहे त्याला प्रेस क्लबने विरोध केलेला आहे. तसेच जे 'महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक' प्रस्तावित आहे त्याला पन्नासहून अधिक संघटनांनी विरोध नोंदवला आहे. हा विरोध सरकार किती खिसगणतीत धरणार हा प्रश्नच आहे. हा सगळा प्रकार सरकारच्या विरोधात उठणारा आवाज दाबून टाकण्यासाठीचाच आटापिटा आहे हे स्पष्ट दिसते आहे. या दोन्ही प्रस्तावांच्या तपशिलाचा अभ्यास केला तर त्यातील अनेक तरतुदी भीषण स्वरूपाच्या आहेत आणि त्या सरळ सरळ लोकांची आणि माध्यमांची मुस्कटदाबी करणार्या आहेत, असे स्पष्ट जाणवते आहे. राज्यात पोलीसराज आणायचा प्रयत्न सुरू आहे काय, असाही एक आक्षेप या निमित्ताने घेतला गेला आहे, त्यातून राज्यातील महायुती सरकारच्या हेतूवर शंका उपस्थित होत आहे. मुळात आता सरकारकडे पाशवी बहुमत असताना अशा तरतुदी करून लोकांचा आवाज दाबून टाकण्याचे काहीही कारण नाही. कारण लोकांनी कितीही आरडाओरड केली तरी सरकार धोक्यात येण्याची यत्किंचितही शक्यता नाही. असे असताना सरकारला अनामिक भीती कशाची वाटते आहे असा प्रश्न निर्माण होतो. मुळात विषय असा आहे की यापूर्वीच्या काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा स्वैरवापर करून तत्कालीन सरकारांच्या विरोधात जोरदार आंदोलने केली, आरोप केले, आवाज उठवले आणि आपले बस्तान बसवले. आता हाच अधिकार विरोधकांना देणे सरकारला नकोसे वाटत आहे. जनता ही मुस्कटदाबी किती काळ सहन करील हे सांगता येत नाही. राज्यातील सरकारचा या मागचा हेतू खरंच उदात्त स्वरूपाचा असेल तर त्यांनी सर्वप्रथम या दोन्ही तरतुदींविषयी आपली बाजू जनतेपुढे नीट मांडली पाहिजे. जनतेचे, विरोधकांचे आणि विविध संघटनांचे याविषयीचे मत सरकारने जाणून घेतले पाहिजे. त्यात लोकांना भीती वाटेल अशा जर काही तरतुदी असतील तर त्याविषयी चर्चा करून त्यात सरकारने दुरुस्ती केली पाहिजे. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी विरोधकांना त्यांची स्पेस देणे अत्यंत आवश्यक आहे. घटनेने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा जो मूलभूत अधिकार दिला आहे त्याचीही जपणूक होणे आवश्यक आहे. पण सरकारच्या विरोधात नाराजीसुद्धा व्यक्त करायची नाही हे कोणीही सहजी मान्य करेल असे वाटत नाही.

राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस हे समंजस आणि सुज्ञ नेतृत्व मानले जाते. या सुज्ञ नेतृत्वाने अशा तरतुदींची खरंच काही गरज आहे का याचा मनापासून विचार केला पाहिजे. अशा तरतुदी करण्यामागे कदाचित सरकारचा विधायक विचारही असू शकेल, पण ते लोकांना पटवून देण्याचे काम फडणवीस यांनीच केले पाहिजे. सरकारविषयी समाजातल्या कुठल्याही घटकांमध्ये जर अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले तर ते वातावरण दूर करणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. अन्यथा बहुमताच्या जोरावर अशा मुस्काटदाबी करणार्या तरतुदी सरकार रेटून नेणार असेल तर ते काही ठीक लक्षण मानता येणार नाही.

# वसुलीच्या नावाखाली वॉटर ग्रीड चे पाणी बंद कार्यकारी अभियंताला निलंबित करा-आ.लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

**तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेली मराठवाडा वॉटर ग्रीड ची सुरुवात परतुर मंठा विधानसभा मतदारसंघातून करण्यात आली आणि ते काम माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी जातीने लक्ष घालून वॉटर ग्रिड योजना पूर्णत्वाकडे नेली आणि आज रोजी विधानसभा मतदारसंघातील जवळपास सर्वच गावांना स्वच्छ व शुद्ध पाणी मिळत आहे परंतु गेल्या अनेक दिवसापासून सदरील योजनेचे पाणीपुरवठा वसुलीच्या नावाखाली बंद करण्यात आला होता हे बाब आ. बबनराव लोणीकर यांच्या निदर्शनास येताच क्षणी त्यांनी गोदावरी पाटबंधारे चे संचालक व पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता यांना धारेवर धरत मराठवाडा वॉटर ग्रीन योजनेचे पाणी तात्काळ सुरू करण्याचे सूचना दिले आहेत . परंतु अद्याप पर्यंत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला नाही. या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी पाणी बंद करण्याचा आदेश केला असेल त्या अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावे अशी पण मागणी करण्यात आली. या सर्व प्रकरणी मा. मंत्री यांनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकी दरम्यान दिलेले निर्देश वसुली करा नसता पाणी बंद करा असे पण आदेश असल्याचे पाटबंधारे विभागाकडून करण्यात आले. असा शासन निर्णय असल्याचे दिसून येत आहे.**

शासन निर्णय दि. २२.१०.२००१ शासनाचे परिपत्रक दि.२१.१२.२००१ दि.२८.०२.२०२५ रोजीची कालवा सल्लागार बैठक घेण्यात आली होती.यावेळी मा. मंत्री जलसंपदा यांनी प्रकल्पाच्या सिंचन व्यवस्थापन, क्षेत्र, वसुली विशेषत जायकवाडी प्रकल्पाबाबत याबाबत तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्याअनुषंगाने सिंचन व्यवस्थापन, क्षेत्र, वसुली यामध्ये सुधारणा होण्यासाठी महत्त्वाचे खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे प्रत्येक विभागाने कार्यवाही करण्यात यावी असे पण आदेश करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने पाणीपट्टीच्या रकमेची आकारणी करून वसुली करणे अंत्यत महत्त्वाचे आहे. प्रत्यक्ष लाभक्षेत्रामध्ये उभे असलेल्या पिकांचे क्षेत्र व मोजणी झालेले क्षेत्र यामध्ये तफावत राहणार नाही याची सर्व कार्यकारी अभियंता/उपविभागीय अभियंता/शाखा अभियंता/क्षेत्रीय सिंचन कर्मचारी यांनी खबरदारी घ्यावी. भविष्यात अशा प्रकारची तफावत असल्याचे निर्दशनास आल्यास, ती गंभीर अनियमितता समजून संबंधितांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रत्यक्षात ज्या पद्धतीची पीक रचना क्षेत्रीय स्तरावर आहे, तीचीच मोजणी होणे अपेक्षित आणि आवश्यक आहे. वस्तुनिष्ठ मोजणी होऊन प्रचलित दराने आकारणी होणे आवश्यक आहे, लाभक्षेत्रामध्ये उभ्या असलेल्या पिकांसंदर्भात मोजणी द्वारे कालव्यांद्वारे भिजणारे क्षेत्र हे मोठ्या प्रमाणावर कमी होत असून विहिरीवर सिंचित होणाऱ्या क्षेत्रामध्ये वाढ झाली आहे. दरवर्षी सातत्याने कालव्यावरील क्षेत्र कमी होणे ही चिंताजनक बाब असून कालव्यावर झालेल मुख्य कालवा व वितरिका निहाय सोडलेले पाणी व होणारा पाणीनाश परीगणित करून पाणीवापराचा ताळेबंद करण्यात यावा, बिगर सिंचन पाणी पट्टी वसुली आणि जबाबदारी निश्चिती करावे व तसेच पट्टी वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी. थकबाकीच्या प्रमाणात वसुली करण्यात यावी. आकारणी १००% वसूल करण्यात यावी. जलाशयावरू। पद्वारे भिजणाऱ्या क्षेत्राची सिंचन पट्टी वसुली १००% करण्यात यावी. प्रसंगी नोटीस देऊन पाणी पुरवठा बंद करण्यात यावा. असे पण आदेश करण्यात आले आहे. या सर्वप्रथम वसुलीला आमचं सहकार्य मात्र रझाकारी खपवून घेणार नाही असा इसारा आमदार बबन लोणीकर यांनी दिला आहे. इजरायलच्या धर्तीवर महत्वकांक्षी असलेल्या योजने बाबत मी वेळोवेळी लक्ष देऊन ही योजना पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत आहे मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांना चुकीचा अहवाल आणि माहिती देऊन अभियंते परतूर मंठा विधानसभा व जालना तालुक्यातील काही भागातील व विशेष करून परतूर,मंठा शहराचा पाणी पुरवठा खंडित करीत आहे. पालिका प्रशासन व ग्रामपंचायत यांना सोबत घेऊन जनता दरबार घेऊन वसुली करण्यासाठी मी स्वतः प्रयत्नशील आहे मात्र वसुलीच्या नावाखाली रझाकारी खपवून घेतली जाणार नसल्याचेही माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले. परतूर,मंठा या दोन मोठ्या शहरांसह ९० गावांचा पाणी पुरवठा मागील काही दिवसापासून खंडित करण्यात आला असल्याची बाब निदर्शनास येताच गोदावरी खोरेचे कार्यकारी संचालक व पाटबंधारे विभागाने अधीक्षक अभियंता यांना धारेवर धरत मराठवाडा वॉटर ग्रीडचा पाणी पुरवठा तत्काळ सुरू करण्यात याव्यात अशी भूमिका माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी घेतली आहे. पाणी सोडण्याचा निर्णय होतो का नाही हे बघून गरजेचं आहे. धुलीवंदन,रमजान सणासुदीच्या दिवसात पाणी बंद करून जनतेला वेठीस धरू नका असे पण आमदार बबनराव लोणीकर यांनी बोलताना व्यक्त केले. परतूर,मंठासह ९० गावासाठी आमदार लोणीकरांची तळमळ आहे. असे पण म्हणाला हरकत नाही.

# वाढदिवसाचा खर्च न करता सुरू केली पाणीपोई




**जालना । प्रतिनिधी**

देशसेवा वेल्फेयर फाउंडेशन आणि नजीर भैय्या मित्र मंडळाच्या वतीने वाढदिवस साजरा न करता त्याचा होणारा खर्च न करता पाणपोई सुरू करण्यात आली . युवा समाजसेवक आणि जालना येथील प्रसिद्ध उद्योजक चेतन जांगडे यांच्या वाढदिवसानिमित्त देशसेवा वेल्फेयर फाउंडेशन आणि नजीर भैय्या मित्र मंडळाच्या वतीने जालना बसस्थानक परिसरात चेतन जांगडे यांच्या हस्ते पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले.

या वेळी देशसेवा वेल्फेयर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख जावेद, समाजसेवक शेख नजीर भैय्या, नईम वस्तद, जफर सेठ, मिर्झा इरफान पठाण, रफिक शेख, सईद शेख, इरफान शेख, अजिम खान, हारून शहा, अश्पाक तांबोली, तबरेज अली, अनिस भाई, सलीम भाई, आरेफ सय्यद, फईम शेख, अकबर शेख, सिकंदर सय्यद, कृष्णा तापडिया, आमेर भाई, अंकित शर्मा, शेख सोहेल, इल्लू पहेलवान, युवराज सिरसाठ, अस्लम मिर्झा, अरबाज शेख, रमजान शेख, सोनू भाई, कैयूम शेख, रहिम पहेलवान, अभिषेक ठाकर, निहाल बिल्डर, सुमीत करंडे, शेख शाहरुख, नईम भाई आदी मान्यवर उपस्थित होते.

# जालना एसटी संघटनेची कार्यकारणी जाहीर

**जालना । पतिनिधी**

जालना येथे एसटी कष्टकरी जनसंघ विभाग यांची वर्ष २०२५ ची जिल्हा कार्यकारिणी गठीत करण्यात आलेली असून फुलंब्रीकर नाट्यगृह जालना येथे वरील कार्यकारिणी सभा संपन्न झाली असून एसटी कष्टकरी जनसंघ संघटनेच्या आगार कार्यकारिणीचे सभासद, अध्यक्ष,सचिव, विभागीय सचिव यांची निवड करण्यात आली .विभागीय अध्यक्षजे एन जाधव ,विभागीय उपाध्यक्षआर एस पगारे ,श्री देशमुख राजेगावकर, ए एच शेख ,विभागीय सह सचिव एस बी जोशी ,पातेकर महाराज ,अंकुशराव टकले ,विभागीय खजिनदार आर बीसंत्रे ,विभागीय कार्याध्यक्षबीजी धोत्रे ,जीपी कांबळे ,अंबड आगार अध्यक्षश्रीपाद कृष्णराव वाघुळकर,व्ही पी शिंदे,आर बी राठोड,डी जी टाक,व्ही पी शिंदे,सचिव के डी चव्हाण,अंबड कार्याध्यक्ष एल बी शिंदे,अंबड खजिनदार के आर देशमुख,सहसचिव व्ही जी जाधव,मीडिया



प्रमुख जीबी काकडे, अशा जालना विभागाची कार्यकारी करण्यात आली त्यामध्ये महाराष्ट्रातले लाभलेले महाराष्ट्रातील उपाध्यक्ष कष्टकरी जनसंघाचे श्री ठेंगडे प्रदेशाध्यक्ष आदित्य खंडागळे भीमराव साखरे तसेच वी उपाध्यक्ष सुरेश जाधव उपमुख्यमंत्रीअजित पवार गटाचे राष्ट्रवादी शहराध्यक्ष प्रतापराव लहाने असा अशा भारदस्त पदाधिकाऱ्यांसमोर जालना युवा जिल्हा पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली त्यावेळी उपस्थित त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की जर कष्टकरी जनसंघातील सभासदांकडे कोणत्या अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी मानसिक छळ करण्याचा प्रयत्न केल्यास त्याला जाब विचारला जाईल अशी ग्वाही देण्यात आली व आनंदाच्या खेळीमेळीच्या वातावरणात कष्टकरी जनसंघांची महाराष्ट्र अध्यक्ष . अॅड.जयश्री पाटील मॅडम संस्थापक अॅड.गुणरत्न सदावर्ते आणि महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले येणारी सीसीएस सीएसटी कष्टकरी जन संघ जिंकणार असे जाहीरनामा करण्यात आला.

## पान १ वरून...

### नितीन गडकरींच्या बागेतील

पुरवणाच्या प्रयत्न ही करेल, असे आश्वासन देत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

------------

### पंकजा मुंडे-सुरेश धस

नाही आणि त्यांनी ते करू नये. पक्षाच्या भूमिकांना ठेच पोहोचू नये म्हणून मी गेले चार पाच महिने नागपूर अधिवेशनापासून ते आतापर्यंत गप्प बसले पण आता मी आता पक्ष श्रेष्ठीना विनंती केली आहे की त्यांना समज द्यावी, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. त्यामुळे मुंडे आणि धस यांच्यातील संघर्ष टोकाला गेल्याचे दिसते.

-------------

### पीओपी मूर्ती संदर्भात अभ्यासगट

पर्यावरणपूरक आणि पारंपरिकतेला धक्का न लावता सकारात्मक निर्णय घेण्यात येईलअसेही मंत्री पंकजा मुंडे त्यांनी विधानसभेत सांगितले.

---------

### धनंजय देशमुखांच्या साडूची

न्याय मागत असताना दुसरीकडे बीड जिल्ह्यात धनंजय देशमुखांच्या साडूचा दादासाहेब खिंडकरांचे दोन जूने व्हिडिओ समाजमाध्यमावर प्रचंड व्हायरल झाले. यात धनंजय देशमुखांचे साडू दादासाहेब खिंडकर एका व्यक्तीला बेदम मारहाण करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ जून असून तो वाद कधीच मिटला असल्याचे ते सांगतात. तर दुसरा व्हिडीओ ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या घरावरील हल्ल्याचा असून दादासाहेब खिंडकरांवर घरफोडी, पैसे उकळून फसवणूक अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. त्यामुळे या व्हिडीओनंतर त्याच्यावर कारवाई केली जाते का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**कोण आहे दादा खिंडकर?**

बीड तालुक्यातील बाभुळवाडी गावचा सरपंच पती दादासाहेब खिंडकर आहे. धनंजय देशमुख यांचा तो साडू आहे. बीड तालुक्यातील बाभुळवाडी गावातील ओमकार सातपुते या तरुणाला चार जणांच्या टोळक्याकडून मारहाण होत आहे. ज्यात दादासाहेब खिंडकर याचा समावेश आहे. या प्रकरणात पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र सदरील प्रकरण आपापसात मिटवण्यात आले. या व्हिडिओ नंतर सध्याचे ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या गाडीची तोडफोड करून घरावर हल्ला करतानाचा व्हिडिओ समोर आला. या प्रकरणात देखील दादा खिंडकर घरफोडी सारख्या गंभीर गुन्ह्याची नोंद आहे. याव्यतिरिक्त नागपूर येथे तरुणांना नोकरी लावतो म्हणून पैसे उकळून फसवणूक केल्याप्रकरणी ४२० अंतर्गत गुन्हा नोंद आहे.

-------------

### अजितदादा पालकमंत्री असल्यामुळे

जिल्ह्याच्या विकासाबाबत अपेक्षा व्यक्त केली. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी हद्दपार करायची असेल तर, तरूणांना रोजगार देऊन गुन्हेगारी पासून परावृत्त करावे लागेल. त्यासाठी बीड येथे असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे गरजेचे आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा ना.अजित पवारांकडे पाठपुरावा सुरू आहे. मागील काही दिवसांपूर्वीच बीड एमआयडीसीचा प्रस्ताव घेऊन आ.संदीप क्षीरसागर ना.अजितदादांना भेटले होते. त्यावर ना.अजितदादांनी विभागाला निर्देश दिले होते. त्यानंतर बीड येथे उपलब्ध असलेल्या २५० एकर जागेचा सर्वे काही दिवसांपूर्वीच झाला आहे. औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी येथे उपलब्ध आहेत. तसेच मोठ्या उद्योजकांनाही भेटलो असून त्यांनीही याठिकाणी उद्योग उभारण्यासाठी तयारी दर्शवली आहे. त्यामुळे बीड एमआयडीसीच्या विकासासाठी निधी देऊन बळ द्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी केली. यासोबतच बीड शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष बाब म्हणून नगरपालिकेकडील वीजबिल भरण्यासाठी निधीची तरतूद करावी त्यामुळे या उन्हाळ्यात खूप मोठा दिलासा बीड शहरातील नागरिकांना मिळेल. टुकूर साठवण तलाव प्रकल्पात सन २००३ मध्येच कार्यारंभ आदेश मिळालेले आहेत परंतु याला असलेल्या स्थानिकांच्या विरोध असल्यामुळे हे काम होऊ शकले नाही. त्यावर मार्ग काढून एकाच ठिकाणी साठवण तलाव करण्याऐवजी चार विविध ठिकाणी बंधारे केल्यास तलावाइतक्याच क्षमतेने पाणी साठवणूक होईल. आणि हे सर्व तलाव प्रकल्पाला लागणार्या रकमेच्या अर्ध्याच रकमेत होणारा प्रकल्प आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाला निधी द्यावा. तसेच शिरूर कासार तालुक्यातील फुलसांगवी येथील २.८३ द.ल.घ.मी. क्षमतेचा साठवण तलाव आहे. परंतु पावसाळ्यातील बदलामुळे तलाव भरण्यासाठी अडचण निर्माण होते. त्यामुळे येथीलच सिंदफणा नदीवर मोठ्या क्षमतेचा बंधारा तयार केल्यास किंवा इतर पर्यायी उपयुक्त मार्गाचा अवलंब करून उपसा जलसिंचन किंवा कॅनॉलद्वारे पाणी तलावात सोडल्यास तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी कायमस्वरूपी मार्ग निघेल. परिणामी परिसरातील अनेक गावांच्या सिंचनाचा प्रश्न सुटेल. त्यामुळे या कामाकरिता निधी देण्यात यावा. त्यासोबतच बीड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढविणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळ्याची उभारणी करणे, स्व.अण्णासाहेब पाटील व स्व.विनायकराव मेटे यांचा पुतळा पंचायत समिती आवारात बसविणे आदी कामांना निधी देण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात केली. बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अतिमहत्वाच्या असलेल्या विविध प्रस्तावित कामांना निधी आणि मंजुरी देण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली.

---------------

### पहिली सुनावणी पुर्ण ; २६ मार्चला

या प्रकरणातील आरोपींना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कोर्टात हजर करण्यात आले होते.

**पहिल्याच सुनावणीला हे गैरहजर**

संतोष देशमुख खून प्रकरणाची पहिली सुनावणी केज न्यायालयात पार पडली. यावेळी विशेष सरकारी वकिल उज्वल निकम यांच्यासह तपास अधिकारी सुट्टीवर असल्याने कोर्टात सुनावणीला आले नाहीत.

**फरार आरोपी कृष्णा आंधळे नाशिकमध्ये?**

नाशिकमध्ये कृष्णा आंधळे असल्याचा दावा करण्यात येत आहे. स्थानिकांनीच आंधळेला पाहिले असल्याचे समोर आले आहे. नाशिकच्या गंगापूर रोड परिसरातील दत्त मंदिर चौकात कृष्णा आंधळेला बघितल्याचा काही लोकांचा दावा. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज वरून तपास सुरु आहे. एका मोटरसायकलवर कृष्ण आंधळे आणि आणखी एक साथीदार या ठिकाणी सकाळी साडेनऊ वाजता दिसल्याचा दावा करण्यात येत आहे.

----------

### मंत्रीपदाचे बांशिंग गुडघ्याला

प्रकाशदादांचा हिरमोड होणार असल्याचे दिसते. मंत्रीपदाबाबत अजित पवारांकडून मोठी खेळी खेळली जाण्याची शक्यता आहे. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यावर त्यांच्या जागी आपली वर्णी लागावी यासाठी अनेकांनी फिल्डींग लावली असल्याचे समजते. बीड जिल्ह्यातही आ. प्रकाश सोळंके यांच्याबाबतीत जोरदार चर्चा आहे. अगोदरच ते मंत्रीपद न मिळाल्याने नाराज असल्याचे बोलले जात आहे. त्यातच मुंडेंच्या राजीनाम्याने त्यांच्या आशा पल्लवित झाल्या असाव्यात. मात्र पक्षांतर्गत वाद वाढू नयेत त्यासाठी अजित पवार हे मोठी खेळी करण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांच मंत्रिपद अजितदादा स्वतःकडे ठेवणार असल्याची चर्चा आता होत आहे. धनंजय मुंडे यांनी अन्न व नागरी पुरवठा या मंत्रिपदाचा कार्यभार सोडल्यानंतर त्यांच्या या मंत्रिपदावर राष्ट्रवादी पक्षाकडून कोण जाणार या संदर्भात चर्चा सुरू होती. अशातच प्रकाश सोळंके, विजयसिंह पंडित या आमदारांच्या नावाची चर्चा सुरू होती. तर मराठा आमदाराला मंत्रिपदी संधी मिळण्याची शक्यताही वर्तविली जात होती. मात्र पक्षात पक्षांतर्गत कोणतीही नाराजी वाढू नये. त्यामुळे या खात्याचा कार्यभार अजित पवार हे स्वतःकडेच ठेवणार असल्याची माहिती आता समोर येत आहे.

-----------------

### खोक्या प्रयागराजमधून अटक;

कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आपल्या सोशल मिडियावर शेअर केले. त्यानंतर पोलिसांकडून त्याचा शोध सुरू झाला. अखेर बुधवारी खोक्या भोसले याला उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमधून बीड पोलिसांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने अटक केली आहे. त्यानंतर आता खोक्यावर आणखी २ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. सतीशच्या घरात शिकारीसाठी लागणाऱ्या वस्तु आणि प्राण्यांचे वाळलेले मांस आढळल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तर शिरूर कासार परिसरात त्याच्यावर गेल्या २० दिवसात हे ३ गुन्हे दाखल झाले आहेत.

**डॉक्युमेंट हरवले आहेत**

स्वाती लिंबाजी सोनटक्के रा. चनई, ता. आंबेजोगाई, जि. बीड सदरील विद्यार्थ्यांचे ANM मार्कशीट, MNC रजिस्ट्रेशन, passing प्रमाणपत्र, Diploma प्रमाणपत्र व इतर वरील प्रमाणपत्र चनई ते अंबाजोगाई प्रवास करत असताना दि .०७/०३/२०२५ रोजी हरवले आहेत. वरील प्रमाणपत्रे ज्या कुणाला सापडल्या संपर्क करा.

**संपर्क:::मो.९७६५५०६१३७**

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. १३ मार्च २०२५




## क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीच्या तयारीसाठी अंबाजोगाईत बैठक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघाच्या वतीने यावर्षी ही क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती विविध उपक्रमांचे आयोजन करून साजरी केली जाणार आहे. जयंतीच्या तयारीचे नियोजन व चर्चा करण्यासाठी अंबाजोगाईत मंगळवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी येथील महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने अंबाजोगाईत ११ एप्रिल २०२५ रोजी १९७ वा क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या जयंती उत्सवानिमित्त आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी शांतीनाथ बनसोडे तर यावेळी डॉ.सुरेश आरसुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. सर्वानुमते अभिवादन, रक्तदान शिबीर अभिवादन रॅली, वृक्ष वाटप आणि प्रबोधनपर व्याख्यान आदी उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत ठरले. तसेच यावेळी भिसी - वर्ष २०२४ ची सांगता ही करण्यात आली. या बैठकीतचे सूत्रसंचालन बी.के.मसने यांनी केले. तर उपस्थितांचे आभार राम वसंतराव घोडके यांनी मानले. या बैठकीस प्रकाश बलुतकर, विष्णु राऊत, अंकुश घोडके, राम जिरे, संतोष राऊत, अनंत मसने, डॉ.दत्तात्रय मसने, भागवत मसने, गणेश जाधव, करपुडे सर, ज्ञानेश्वर जिरे, बालासाहेब माळी, डॉ.फुटाणे सर, मधुकर घोडके, बंडू मसने, रमेश जिरे, बलुतकर सर, मिलिंद बाबजे, पंकज राऊत, नितीन जिरे, मंगेश बलुतकर, अभय जिरे, निवृत्ती जिरे, संदेश डाके, शरद माळी, भारत घोडके, श्रीकृष्ण घोडके, बळीराम धनवडे, आकाश चोपने, गजानन घोडके, प्रविण चोपने, योगेश कातळे, अक्षय घोडके, बालाजी घोडके, बालाजी जिरे, दिपक आरसुडे, ऋषि मसने, कृष्णा मसने, नवनाथ माळी, अनिकेत घोडके, पवन घोडके, अक्षय चोपने, पवन जिरे, दामोदर माळी, भागवत जिरे, किरण भालेकर, सुधीर माळी, रोहन माळी, बाळु फुलझळके, दत्तात्रय बनसोडे, शाहीर तुकाराम, प्रविण जोगदंड, राहुल जिरे, अतुल राऊत, सतिश राऊत, आदींसह समाज बांधवांची उपस्थिती होती.

# पत्रकार तुषार खरात यांच्यावरील खोटे गुन्हे रद्द करावेत

## माध्यमांची मुस्कटदाबी, मानसिक खच्चीकरण होऊ देणार नाही; मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांचा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

खोटे गुन्हे दाखल करून पत्रकारांचा आवाज बंद करण्याचा अत्यंत निंदनीय प्रकार महाराष्ट्रात सुरू आहे.. ''लई भारी'' युट्यूब चॅनलचे संपादक तुषार खरात या मालेतले ताजे बळी ठरले आहेत.. तुषार खरात यांच्यावर विनयभंग, अॅट्रॉसिटी, पाच कोटींच्या खंडणीचे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.. त्यांना अटकही करण्यात आली आहे.. तुषार खरात तुरूंगातून बाहेर येऊच नयेत हा तर कारवाई मागचा उद्देश आहेच त्याचबरोबर तमाम पत्रकारांवर दहशत बसविणे हा देखील हेतू आहे.. याचा मराठी पत्रकार परिषद, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, डिजिटल मिडिया परिषद तीव्र शब्दात निषेध करीत आहे.. जयकुमार गोरे यांच्या विरोधात बातमी केल्यानंतर लगेच तुषार खरात यांच्यावर एका पाठोपाठ एक असे गुन्हे दाखल झाले... अन्य प्रकरणात पोलीस ही तत्परता दाखवत नाहीत.. हे संतापजनक असून सरकारने तुषार खरात यांच्यावरील हे खोटे गुन्हे रद्द करावेत आणि तुषार खरात यांची सुटका करावी अशी मागणी मराठी पत्रकार परिषद करीत आहे..मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयात लक्ष घालून खोटे गुन्हे दाखल करून माध्यमांची गळचेपी होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी विनंतीही एस.एम.देशमुख यांनी केली आहे..तसेच महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदयाची अंमलबजावणी करावी अशी मागणीही देशमुख यांनी केली आहे..

मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी पुढे म्हटले आहे की, मराठी पत्रकार परिषदेने तुषार खरात यांच्या अटकेचा निषेध तर केला आहेच त्याच बरोबर आम्ही तुषार खरात यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहोत..तुषार खरात यांच्यावरील बेबंद कारवाईचा निषेध करायचा की नाही यावरून पत्रकार संघटनांत दोन मत प्रवाह दिसतात .. काही जण म्हणतात, ''दुसरी बाजू समजून घ्या'' .. मात्र संघटना म्हणून मला दुसरी बाजू समजून घ्यायची अजिबात गरज वाटत नाही.. कारण आम्ही न्यायाधीश नाही आहोत. आम्ही



माध्यम स्वातंत्र्यासाठी, पत्रकारांच्या हक्कासाठी, हितासाठी काम करतो, लढतो. तुषार खरात यांनी बातम्या केल्या, त्यानंतर चिडून गोरे यांनी त्यांच्या विरोधात खोटे गुन्हे दाखल केले हे स्पष्ट आहे.. म्हणजे विषय व्यक्तीगत नसून पत्रकारितेशी संबंधित आहे.. त्यावरून खरात यांच्यावर अॅट्रॉसिटी, विनयभंग आणि खंडणीचे गुन्हे दाखल करणे संतापजनक, निषेधार्ह आहे.. मुळात ही पध्दत चुकीची आहे.. तुषार खरात यांनी खोट्या बातम्या दिल्या असं तुमचं म्हणणं असेल तर त्यांच्या विरोधात कोर्टात बदनामीचा दावा दाखल करता येऊ शकतो, त्याने न्यायालयाचा आदेश डावलून काही केले असेल तर कंन्टेम्प्ट ऑफ कोर्ट करता येऊ शकेल किंवा विधानसभेत हक्कभंग आणता येऊ शकेल.. हे न करता त्यांच्या विरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याचा अर्थ एवढाच की, संबंधितांना माध्यमांवर दहशत बसवायची आहे.. माध्यमांचा आवाज बंद करायचा आहे.. अशा वेळेस पत्रकार संघटना गप्प राहिल्या तर हा पॅटर्न राज्यभर राबविला जाईल आणि मग पत्रकारांना काम करणे अवघड होईल..तुषार खरात यांनी पाच कोटींची खंडणी मागितली असेल तर त्याचे पुरावे देण्याची नैतिक जबाबदारी देखील गोरे यांची आहे.. पुरावे दिले जात नाहीत.. पत्रकार परिषद घेऊन गोरे यांनी हे पुरावे दिले पाहिजेत.. पत्रकारांच्या प्रश्नांना सामोरं गेलं पाहिजे.. अगोदरच सरकार पत्रकार संरक्षण कायदा होऊनही तो लागू करत नाही, पुढे जाऊन पत्रकारांवर नजर ठेवण्यासाठी १० कोटी रूपये खर्च करून सरकार देखरेख सेंटर सुरू करीत आहे, पत्रकारांवर शारीरिक हल्ल्यांच्या घटना राज्यभर वाढल्या आहेत.. अशा स्थितीत व्यक्तीगत रागलोभ, हेवेदावे, मतभेद बाजुला ठेऊन सर्व संघटना आणि पत्रकारांनी एकत्र येत या आव्हानाचा मुकाबला करण्याची गरज आहे.. कारण तुषार खरात आज जात्यात आहे, अन्य आपण सारे सुपात आहोत.. सत्तेचा वापर करून कधीही, कोणाविरोधात ही खोटे गुन्हे दाखल केले जाऊ शकतात.. हा ट्रेण्ड केवळ माध्यमांसाठीच नाही तर लोकशाहीसाठी देखील धोकादायक असल्याने आम्ही तुषार खरात यांच्या सोबत आहोत..तुषार खरात यांच्याशी माझी फारशी ओळख नाही, प्रश्न इथं तुषार खरात आहेत की आणखी कोणी हा नाहीच प्रश्न विविध पध्दतीने माध्यमांची मुस्कटदाबी करण्याचा, पत्रकारांचे मानसिक खच्चीकरण करून त्यांचा आवाज बंद करण्याचा आहे.. आम्ही हे होऊ देणार नाही.. असाही इशारा एस.एम. देशमुख यांनी दिला.

## पक्षाने दिलेली जबाबदारी सक्षमपणे पेलवून टाकलेला विश्वास सार्थ ठरविणार - रेणुका पुंड

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) ओबीसी विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस रेणुका पुंड यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र राष्ट्रवादीचे ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी अहिल्यानगर येथील ओबीसी विभागाच्या पदाधिकारी संपर्क अभियान कार्यक्रम प्रसंगी रेणुका पुंड यांना दिले.याप्रसंगी राष्ट्रवादीचे ओबीसी प्रदेश कार्याध्यक्ष सचिन औटे, राष्ट्रवादी महिला अध्यक्ष आशा निंबाळकर, राष्ट्रवादी ओबीसी विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष अमित खामकर, ओबीसी जिल्हाध्यक्ष डी. आर.शेंडगे,सामजिक न्याय अध्यक्ष सुरेश बनसोडे,राष्ट्रवादी अर्बन विभागाचे अध्यक्ष प्रा अरविंद शिंदे,डॉक्टर विभागाचे अध्यक्ष डॉ रणजित सत्रे,युवक अध्यक्ष सागर गुंजाळ,राष्ट्रवादी व्यापार अध्यक्ष उमेश धोंडे,सामाजिक न्याय महिला अध्यक्ष साधना बोरुडे,फुले बिग्रेड भिंगार अध्यक्ष संतोष हजारे,बाळासाहेब भुजबळ,अनिल इवले आदी उपस्थित होते.रेणुका पुंड यांनी फुले बिग्रेड महिला अध्यक्ष म्हणून विविध सामाजिक, शैक्षणिक कामातून वेगळा ठसा उमटवला आहे. समाजातील गोरगरीब, गरजू तसेच अडीअडचणीच्या वेळी सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारी कार्यकर्ता म्हणून पुंड यांची ओळख आहे. महिलांचे मोठे संघटन त्यांनी उभे केले आहे. रेणुका पुंड यांच्या या जमेच्या बाजू आहेत. ते प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होतात. त्यांची काम करण्याची वेगळी हातोटी आहे. या त्यांच्या अष्टपैलू कामाची दखल घेत व फुले, शाहू, आंबडेकर यांचे विचार समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी विभागाचे प्रदेश अध्यक्ष कल्याण आखाडे यांच्या हस्ते पुंड यांची ओबीसी विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी निवड करण्यात आली आहे.या निवडीबद्दल रेणुका पुंड यांचा सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे व शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली पक्ष बळकटीसाठी व मजबूत करण्यासाठी तसेच पक्षाची ध्येय धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यरत राहील, अशी प्रतिक्रिया रेणुका पुंड यांनी निवडीनंतर दिली.



### अजितदादांचा विश्वास सार्थ ठरवणार

पक्षाने दिलेली जबाबदारी सक्षमपणे पेलवून टाकलेला विश्वास सार्थ ठरविणार आहे. जिथे जिथे माझी गरज पक्षाला पडेल त्या त्यावेळी मी उपलब्ध राहील. समाजाला न्याय मिळेल, असे काम करून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विश्वास सार्थ ठरवेन, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी ओबीसी प्रदेश नूतन सरचिटणीस रेणुका पुंड यांनी दिली

## राष्ट्रीय एकात्मता की, ऐतिहासिक संदर्भ नेमके काय महत्त्वाचे हे ठरविण्याची वेळ आली आहे - डॉ. इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारत देशातील सद्य:परिस्थिती पाहता देश जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या, गरीबी श्रीमंती या भेदभावाच्या आधारावर उभ्या फुटीच्या मार्गावर जात आहे. इतिहासाचा उपयोग करून संधी साधू राजकारणी आपला मतलब साध्य करण्यासाठी विविध जाती धर्मांमध्ये भांडण लावण्यासाठी ऐतिहासिक संदर्भांचा उपयोग करीत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता महत्त्वाची की, इतिहासामधील ऐतिहासिक संदर्भ महत्त्वाचे याचे परीक्षण करण्याची वेळ आली आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी केले. ते सेंट एँथनी स्कूल मधील वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या बक्षीस वितरण प्रसंगी उदघाटक मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.




यावेळी व्यासपीठावर फादर प्रदीप कुमार, मेजर दिलीप निकम, प्राचार्य नन आरोग्यम यांची प्रमुख उपस्थिती होती. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन डॉ.राजेश इंगोले व मेजर दिलीप निकम यांच्याहस्ते क्रीडा ज्योत पेटवून करण्यात आली. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी राजकारण्यांनी या देशाचे वाटोळे करण्याचा प्रन केलेला आहे. आपल्यालाच राज्यसत्ता प्राप्त व्हावी म्हणून माणसांमध्ये जाती-धर्माच्या आधारे द्वेष निर्माण करून सामाजिक एकात्मते मध्ये दोन्ही करण्याचे पाप हे राजकारणी करीत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता प्रचंड प्रमाणात धोक्यामध्ये आलेली आहे. त्यामुळे आता सध्या परिस्थितीमध्ये सामान्य जनतेने घडत असलेल्या गोष्टींचे आकलन करून त्या योग्य आहेत की अयोग्य हे ठरवण्याची वेळ आलेली आहे कोणताही राजकारणी विश्वासार्ह न राहिल्याने विश्वास कुणावर ठेवायचा हा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडलेला आहे. महापुरुषांच्या जीवनावरील चित्रपट विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये प्रेरणा निर्माण करण्यापेक्षा इतर जातींविषयी द्वेष निर्माण करण्याचे काम करीत आहे. किंबहुना हे चित्रपट याच हेतून काढलेत की काय अशी शंका मनामध्ये राहून राहून येते. त्यामुळे समाजातील जबाबदार घटकांनी डॉक्टर्स, वकील, शिक्षक, प्राध्यापक यांनी आपली जबाबदारी ओळखून विद्यार्थ्यांना, समाजाला काय चूक आहे व काय बरोबर आहे याचे योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. जनतेला इतिहासामध्ये काय घडले आहे, कसे चुकीचे घडले होते यामध्येच गुंग करून अडकवून ठेवले आहे. काय चुकीचे घडले यापेक्षा काय बरोबर घडवायचे आहे यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे. सद्य:स्थितीमध्ये राष्ट्राने काय प्रगती केली आहे, सरकारने लोकांसाठी कोणत्या जनहित कार्य योजना आणलेले आहेत याचा उहापोह होऊ नये म्हणून सरकार भावनिक मुद्दे निर्माण करून विकासाच्या मुद्द्यांवरून जनतेचे लक्ष भरकटवून टाकत आहे. हे षडयंत्र लोकांच्या लक्षात आले पाहिजे याकरिता समाजातील जबाबदार घटकांनी आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली पाहिजे. समाजामध्ये ज्या पद्धतीने गुन्हेगारीचे उदात्तीकरण होत आहे. युवकांपुढे गुंड लोक रोल मॉडेल म्हणून येत आहेत. समाजामध्ये स्त्रिया सुरक्षित नाहीत रोज खुनाच्या, बलात्काराच्या घटना ऐकून कान सुन्न झाले आहेत. याचं कारण म्हणजे पुस्तकातलं पहिलं पान शिकवायचंच राहून गेलेल आहे ज्यामध्ये भारत माझा देश आहे आणि सारे भारतीय माझे बांधव आहेत हे लिहिलं आहे. ही खंत डॉ. इंगोले यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी आपले कला, क्रीडा कौशल्य वापरून आपल्या बुद्धीचा मेंदूचा शरीराचा विकास करून घेऊन सशक्त आणि निरोगी बनावे व राष्ट्रहितासाठी कार्य करावे अशी अपेक्षा डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी फादर प्रदीप कुमार यांनी विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये आनंदी राहण्यासाठी अभ्यासासोबतच एखादी कला किंवा क्रीडा कौशल्य आत्मसात करावे असे आवाहन केले. यावेळी बोलताना मेजर दिलीप निकम यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली मी, प्रथम भारतीय व अंतिमतः भारतीय ही गोष्ट प्रत्येक भारतीयाने लक्षात ठेवून देशाप्रती समर्पणाची भावना ठेवली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी विविध क्रीडा प्रकारांमध्ये नैपुण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ.राजेश इंगोले व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

## वडवणीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने केली निदर्शने आणि लेखणीबंद आंदोलन

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा आहे. हा निर्णय मागे घेण्यासाठी काल बुधवार दि.१२ रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा बीड जिल्हा ,वडवणी तालुका यांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर लेखणी बंद आंदोलन करून निदर्शने करण्यात आली.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक मा श्री संजय भोकरे साहेब, राष्ट्रीय अध्यक्ष श्री अशोक वानखेडे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, राज्य समन्वयक नितीन शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी सर, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकारने खाजगी संस्थेमार्फत मीडिया मॉनिटरिंग करण्याचा घेतलेला निर्णय त्वरित मागे घ्यावा या मागणीसाठी तहसील कार्यालयासमोर लेखणी बंद आंदोलन करून निदर्शने करण्यात आली.तसेच आठ दिवसांत मागण्या मान्य कराव्यात नसता मंत्रालय मुंबई येथे लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी तहसीलदार यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे देण्यात आला यावेळी वडवणी येथील लेखणी बंद आंदोलनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव, वडवणी तालुका अध्यक्ष अशोकराव निपटे,शांतीनाथ जैन तालुका उपाध्यक्ष, अर्जुन मुंडे तालुका सचिव, शंकर झाडे ता.कोषाध्यक्ष, सतिष राव मुजमुले डिजिटल मिडिया वडवणी तालुका अध्यक्ष,शेख एजाज ता.उपाध्यक्ष, अशोकराव फपाळ ता.सचिव, अंकुश गवळी कोषाध्यक्ष, श्रीनिवास काकडे पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुका अध्यक्ष, ज्ञानेश्वर लंगे उपाध्यक्ष, गंगाभिष्म आंडील सचिव, शंकर जाधव कोषाध्यक्ष, विष्णु डोईफोडे सदस्य इत्यादी सहभागी झाले होते.

पान ६ वरून...

### 'मैं हूँ स्वयं सिद्धा' पुरस्काराने

चूक एखाद्याचे जीवन उद्ध्वस्त करून टाकते. त्यातलाच हा प्रकार आहे. सुनंदा मुंदडा यांना लहानपणी चुकीची इंजेक्शन दिल्यामुळे रिएॅक्शन येऊन एक पाय निकामी झाला. आणि त्यांच्यावर कृत्रिम अपंगत्व ओढवले. मात्र त्यांनी स्वकर्तृत्वाने अपंगत्वावर मात केली. व संघर्षमय जीवनातून खंबीर उभ्या राहिल्या. सामाजिक,शैक्षणिक व सहकार क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे.

### लिनेस क्लब अंबाजोगाईच्या

समाजातील प्रत्येक घटकाने या सफाई कर्मचारी महिलांच्या योगदानाची कदर केली पाहिजे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.या विशेष सोहळ्याला लिनेस क्लबच्या लिनेस क्लबच्या अध्यक्षा लि. आशा वाघमारे, उपाध्यक्ष लि. वर्षा देशमुख, कोषाध्यक्ष लि. अयोध्या गाठाळ, सचिव लि. ललिता पुजारी, वरिष्ठ सदस्य लि. भागीरथी वाडेकर, कॅबिनेट ऑफिसर लि. प्रभावती आवचार-तट, लि. प्रतिभा देशमुख, लि. विजया खोगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### गोमळवाडा येथे छ.शिवाजी

ह.भ.प.भगवान महाराज बारगजे,चेअरमन वैशाली गवळी,जेष्ट पत्रकार विजयकुमार गाडेकर,गोकुळ पवार,भारतकुमार पानसंबळ,प्रकाश साळवे,संचालक रमेश जरांगेसर,लोकनेते गोपीनाथ मुंडे पतसंस्थेचे उपाध्यक्ष लखूळ मुळेसर,स्वच्छतादुत योगीता गवळी,व्यवस्थापक राम सुरे आदींची उपस्थिती होती.यावेळी महंत भानुदास शास्त्री म्हणाले की थोर नेत्यांचे विचार अंगीकारून सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे असे सांगितले तर अध्यक्षीय समारोपात तहसीलदार घोळवे म्हणाले की आपण सर्व विभन्न आहेत परंतु सगळे माणसच आहोत असून आपण सर्व भारतीय असल्याचे सांगुन एकता व समतेचा संदेश दिला.यावेळी शिवसेना ता.प्रमुख सोपन मोरे व पत्रकार गोकुळ पवार यांनी मनोगत व्यक्त करून आयोजकांनी जातीय सलोख्या चांगला प्रयत्न केला आहे असे सांगितले.या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक एकतेच्या उद्देशाने सिंदफणा अर्बनच्या वतीने करण्यात आले होते.कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन शिवव्याख्याते कैलास तुपेसर यांनी केले तर आभार सचिव महादेव कातखडेसर यांनी मानले.

### यशवंतराव चव्हाण यांच्या

विचाराची गरज आहे यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राशिवाय देशाची राजकारण स्वच्छ आणि चारित्र्यसंपन्न राजकीय विचाराची निर्मिती केली असे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे संचालन डॉक्टर लोखंडी देवी यांनी केले तर आभार प्राध्यापक रामकृष्ण प्रधान यांनी मान्य या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मानूरच्या उपसरपंच पदी मोहब्बत

सरपंच अशोक मामा पाखरे यांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदारांनी प्राधिकृत केले होते. सकाळी दहा वाजता निवडणूक प्रक्रिया सुरू झाली दुपारी बारा वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत होती मात्र उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज मोहब्बत खान समशेर खान पठाण यांचा दाखल झाल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पठाण यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले या बैठकीला मंडळ अधिकारी निळकंठ सानप, ग्राम विस्तार अधिकारी डी एम वाणी , ग्राम महसूल अधिकारी भगवान टाक , यांच्यासह श्रीमती सविता अर्जुन बनसोडे ,गुलाब दगडू पठाण ,गीता अनिल बडे ,ललिता गहिनीनाथ सुरसे, सुभाष मोहनराव सीरसाट, ज्योती भगवान पाखरे ,सुमय्या आदम पठाण ,रामदास बापूराव गावडे ,मीरा भीमराव पवार ,संजू विठ्ठल ढाकणे ,वेणूबाई रणजीत गुजर हे ग्रा प सदस्य उपस्थित होते.

उपसरपंच पदाची बिनविरोध निवड झाल्यानंतर सर्व ग्रा प सदस्यांनी जाटवडच्या गोपीनाथ गडावर जाऊन विजय उत्सव साजरा केला. याप्रसंगी ज्येष्ठ उद्योगपती तथा मानूर चे सुपुत्र लिंबा शेठ नागरगोजे, ज्येष्ठ पत्रकार संतोष मानूरकर, कलंदर काका पठाण, पोपटराव शिरसाट, उल्हास पाखरे सर आदी उपस्थित होते.

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात ५४ गरजूंना कृत्रिम हात व पायाचे वितरण

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव येथे माजलगाव तालुक्यातील दिव्यांगांकरिता मोफत कृत्रिम हात, पाय,स्प्लीट, कॅलीपर्स मोजमाप व तात्काळ (ऑन द स्पॉट) वितरण शिबीर संपन्न झाले. याप्रसंगी व्यासपीठावर श्रीमती ज्योत्स्ना मुळीक गटविकास अधिकारी,पंचायत समिती माजलगाव,डॉ.गजानन होन्ना उपप्राचार्य डॉ.रुपेश जाधव समन्वयक एस आर ट्रस्ट, डॉ.रुक्मिणी सोनेवार,डॉ.राज शर्मा सदस्य एस आर ट्रस्ट,दत्ता क्षीरसागर तालुका उपाध्यक्ष सक्षम, सचिन जाधवर समन्वयक संवेदना प्रकल्प हे उपस्थित होते.हे शिबिर जिल्हा प्रशासन समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड, पंचायत समिती माजलगाव, रा.स्व.संघ जनकल्याण समिती (महाराष्ट्र प्रांत) समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडळ व एस. आर. ट्रस्ट मध्यप्रदेश अलीमको यांच्या सहयोगातून




पार पडले.या शिबिरात एकूण ५४ दिव्यांगाना कृत्रिम हात,पाय व स्प्लीट, कॅलीपर्स लाभ झाला. या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. याप्रसंगी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक गटविकास अधिकारी, पंचायत समिती माजलगाव यांनी आपल्या मनोगतात अशा प्रकारच्या शिबिराची समाजातील काही दिव्यांगांना खूप गरज असल्याचे स्पष्ट केले व हा उपक्रम पंचायत समिती माजलगाव आणि श्री सिद्धेश्वर महाविद्यालय यांच्या प्रयत्नातून संपन्न होत असल्याने मला खूप आनंद होतो आहे असे स्पष्ट केले. पंचायत समितीच्या माध्यमातून दिव्यांगासाठी असणाऱ्या विविध विकास योजनांची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली. एस आर ट्रस्ट चे डॉ.रुपेश जाधव यांनी ही योजना आमच्या ट्रस्टच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन आणि जनकल्याण समिती यांच्या सहयोगातून आम्ही मराठवाड्यातील सातही जिल्ह्यामध्ये सर्व तालुक्यांमध्ये घेत असून यामध्ये बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात हे शिबीर संपन्न होत असल्याचे सांगितले. या शिबिरामध्ये दिव्यांगांसाठी ऑन द स्पॉट म्हणजेच तात्काळ कृत्रिम हात कृत्रिम पाय या शिबिरातच बसवून देत आहोत, ज्या कृत्रिम हात पायासाठी लाखो रुपये खर्च होतात ते या शिबिराच्या माध्यमातून आम्ही मोफत देत आहोत असे सांगितले. या शिबिराचे अध्यक्ष समारोप डॉ. गजानन होंन्ना यांनी केले. यात महाविद्यालय शिक्षणासोबतच विविध समाज उपयोगी उपक्रम घेत असून त्यात हे शिबिर आहे, असे सांगितले. नजीकच्या काळात विविध प्रकारचे शिबिरे आयोजन करण्याचा मानसही त्यांनी बोलून दाखवला. या शिबिराचे सूत्रसंचालन डॉ.रमेश गटकळ आणि आभार प्रदर्शन डॉ. कमलकिशोर लड्डा सहसंयोजक सक्षम यांनी केले. या शिबिराच्या आयोजनासाठी आणि यशस्वीतेसाठी एस आर ट्रस्टची तंत्र स्नेही कामगाराची टीम,प्राचार्य प्रो.मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये संयोजक व तालुकाध्यक्ष सक्षम, दत्तात्रय क्षिरसागर तालुका उपाध्यक्ष सक्षम, अशोक थळपती मुख्याध्यापक मूकबधिर विद्यालय, दिव्यांग संघटनाचे पदाधिकारी व श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेला दुधी भोपळ्याच्या वाणाला मान्यता

पुणे : महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेला दुधी भोपळ्याचा आर.एच.आर.बी.जी.-५४ (फुले गौरव) हा सुधारित वाण अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (भाजीपाला पिके) या योजनेची वार्षिक आढावा बैठकीत राष्ट्रीय पातळीवर प्रसारित झाला आहे. मध्य प्रदेश, गोवा व महाराष्ट्र या राज्यांसाठी शेतकऱ्यांना या वाणांची लागवड करता येणार आहे.

अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (भाजीपाला पिके) या योजनेची वार्षिक आढावा बैठक ३ ते ५ मार्च या कालावधीत पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना (पंजाब) येथे झाली. पंजाब कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सनबिर सिंग घोंसाल, दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन परिषदेचे सहसंचालक डॉ. संजय सिंग, लुधियाना येथील पंजाब कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. ए.एस. धट, वाराणसी येथील भारतीय कृषी संशोधन परिषद-भारतीय भाजीपाला संशोधन संस्थेचे प्रकल्प समन्वयक डॉ. राजेश कुमार, लुधियाना येथील पंजाब कृषी विद्यापीठाचे उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. टी.एस. धिल्लोन, दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन परिषदेचे ए.डी.जी. डॉ. सुधाकर पांडे, वाराणसी येथील भारतीय कृषी संशोधन परिषद-भारतीय भाजीपाला संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एन.राय, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.



के.ई. लवांडे व देशातील वेगवेगळ्या राज्यातील ६० प्रकल्पांचे एकूण ४०० शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. या बैठकीला महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या भाजीपाला संशोधन प्रकल्पाचे डॉ. बी. टी. पाटील, डॉ. शर्मिला शिंदे, प्रा. चिमाजी बाचकर व डॉ. शालीग्राम गांगुर्डे उपस्थित होते. या बैठकीमध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वित भाजीपाला संशोधन प्रकल्पाच्या भाजीपाला लागवडीबाबत, बीजोत्पादन आणि पीक संरक्षणाबाबतच्या एकूण सहा शिफारशी मंजूर करण्यात आल्या. तसेच या आढावा बैठकीत महात्मा फुले कृषी विद्यापीठातील भाजीपाला संशोधन प्रकल्पाने संशोधित केलेला दुधी भोपळ्याचा आर.एच.आर.बी.जी.-५४ (फुले गौरव) हा सुधारीत वाण राष्ट्रीय पातळीवर मध्य प्रदेश, गोवा व महाराष्ट्र या राज्यांसाठी प्रसारित करण्यात आला. हा सुधारीत वाण डॉ. बी.टी. पाटील, वाय.आर. पवार व डॉ. एस.ए. अनारसे यांनी विकसित केला आहे. या उत्कृष्ट संशोधनासाठी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. शरद गडाख, माजी कुलगुरू कै. डॉ. पी.जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के आणि माजी संशोधन संचालक डॉ. एस.डी. गोरंटीवार, माजी विभाग प्रमुख डॉ. श्रीमंत रणपिसे यांचे सतत मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले. प्रकल्पाच्या या यशस्वी वाटचालीमध्ये सर्व कामगार वर्ग, शास्त्रज्ञ, शिक्षकेतर कर्मचारी यांचा महत्त्वाचा सहभाग असल्याचे प्रतिपादन डॉ. बी. टी. पाटील यांनी केले.

### विकसीत केलेल्या वाणांची वैशिष्टे

महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या दुधी भोपळ्याचा आर.एच.आर.बी.जी.-५४ (फुले गौरव) या वाणाची फळे मध्यम लांबीची (२७ ते ३० सें.मी.), दंड गोलाकार असून सरासरी फळांचे वजन ५४० ते ५५० ग्रॅम आहे. हा वाण भुरी आणि केवडा रोगास प्रतिकारक्षम असून फळांचे हेक्टरी उत्पन्न सरासरी ४१३.०० क्विंटल मिळते अशी माहिती वरिष्ठ भाजीपाला पैदासकार तथा उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील यांनी दिली.

# गंधकाचा वापर केल्यास शेतमालाचे उत्पादन मिळते दर्जेदार



चांगल्या दर्जाच्या उत्पादनासाठी, पिकातील पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविण्यासाठी गंधक हे अन्नद्रव्य महत्वाचं आहे. पण पिकाला फक्त नत्र. स्फुरद आणि पालाश या अन्नद्रव्यांचा पुरवठा करण्याकडे अनेक शेतकऱ्यांचा कल असतो. संशोधनावरून गंधक वनस्पतीच्या वाढीसाठी मुख्य अन्नद्रव्य गणले जाऊ लागले आहे. पीक व्यवस्थापन करताना मुख्यतः नत्र, स्फुरद व पालाश या अन्नद्रव्यांचा वापर केला जातो. त्यामुळे उर्वरित अन्नद्रव्यांची कमतरता वाढत जाते. अलीकडे जमिनीत गंधकाची कमतरता जाणवू लागली आहे. गंधक मातीचा सामू कमी करण्याचं काम करतो. त्यामुळे चुनखडीयुक्त चोपण जमिनीमध्ये गंधकाचा वापर अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

गंधक हे पिकाच्या वाढीसाठी दुय्यम अन्नघटक असला तरी. संशोधनावरून गंधक वनस्पतीच्या वाढीसाठी मुख्य अन्नद्रव्य गणले जाऊ लागले आहे. कारण गंधक पिकातील हरितद्रव्यनिर्मितीची आणि प्रकाश संश्लेषणाची प्रक्रिया वाढविण्यास मदत करते याशिवाय गंधक बीज निर्मिती प्रक्रियेमध्ये मदत करते. उच्च प्रतीच्या शेतमालाची निर्मिती होण्याकरिता मदत करते. वनस्पतीमधील पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविते. पिकामध्ये गंधक कमतरतेची लक्षणे साधारणतः पिकाच्या काढणीच्या अवस्थेत दिसून येतात. त्यामुळे जमिनीतील गंधकाची कमतरता ओळखून पुढील हंगामातील पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी प्रयत्न करता येतात.

जमिनीमध्ये गंधक कमतरतेची कारणे :मातीच्या ऱ्हासामुळे आणि निचऱ्यामुळे जमिनीतील गंधकाचे प्रमाण घटते.

गंधकविरहित किंवा गंधकाचे प्रमाण अतिशय कमी असलेल्या खतांचा वापर केल्यामुळे जमिनीतील गंधकाचे प्रमाण कमी होते. शेतातील पिकांचे अवशेष, सेंद्रिय खते आणि काडी कचरा जमिनीतच न कुजवल्यामुळेही जमिनीत गंधकाची कमतरता दिसून येते.पिकातील गंधक कमतरतेची लक्षणे :कडधान्य वर्गीय पिकाच्या मुळावर असणाऱ्या नत्र स्थीरीकरण करणाऱ्या गाठीच्या संखेत घट होते. त्यामुळे नत्र स्थीरीकरणाचे प्रमाण कमी होते. फळे पूर्णपणे परिपक्व होत नाहीत. पिकांमध्ये प्रकाश संश्लेषणाची क्रिया आणि हरित द्रव्याची निर्मिती मंदावलेली दिसते. रुंद पाने असलेली पिकाची पाने चुरडलेली दिसतात. गळित धान्यातील दाण्याचा आकार, तजेलदारपणा त्यातील तेलाचं प्रमाण कमी झालेलं दिसतं. फळातील एकूण विद्राव्य घनपदार्थांचं प्रमाण कमी होतं आणि नत्र देऊनही हिरवी होत नाहीत.

# फुलगळ आणि फळगळ होण्याची कारणे

शेतकरी मित्रानो, बदलते हवामान आणि नवनवीन कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव यामुळे फुलगळ आणि फळगळीचा सामना करावा लागतो आहे. त्यामुळे उत्पादनावर परिणाम होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे आजच्या लेखात आपण फळगळ आणि फुलगळ याची कारणे जाणून घेऊया.

फुलगळ का होते ? ज्यास्त नत्र युक्त खते त्यामुळे फुलगळ होते. जिब्रेलीन वाढले की फुलगळ होते मग ते पाऊस झाला तरी जिब्रेलीन वाढते किंवा स्प्रे मधून गेला तरी

३ सतत पाऊस चालला त्यामुळे ही फुलगळ होते. काही वेळा बुरशी मुळे ही फुलगळ कळी कुज होते. हार्मोन्स मुळे ही फुल गळ होते तेव्हा आम्ही ड्रीप किंवा स्प्रे मधून देतो. खूप थंडी म्हणजे १० अंश सेल्सियस तापमान झाले की फुलगळ होते. आणि ३८ अंश सेल्सियस च्या वर तापमान गेले तरी फुलगळ होते १५ ते ३५ हा बॅलन्स पाहिजे. नत्र युक्त खते स्प्रे मधून गेली की फुल गळ होते. झिंक ,बोरॉन ,कॅल्शियम च्या कमतरतेमुळे देखील फुलगळ होते. लवकर म्हणजे सेटिंग च्या काळात किंवा फुल लागली तेव्हा पोटॅश दिले किंवा सल्फर दिले तरी फुल गळ होते. झाडाला पाण्याचा ताण दिला तरी फुलगळ होते. किंवा अधिक पाणी दिले तरी फुलगळ होते. झाडावर भुरी ,डाऊनी ,करपा चा अटॅक झाला तरी फुलगळ होते. झाडाला अन्नद्रव्य ही स्टेज नुसार वेगवेगळी दयावी लागतात ती मागे पूढे झाली तरी फुलगळ होते. जर काही प्रमाणात तणनाशक फवारले गेले असेन तरी फळ आणि फुल गळते. चुकीचे संजीवक फवारणी झाली किंवा प्रमाण चुकले तरी फुलगळ होते. प्रखर सूर्यप्रकाश या मुळे देखील फुल गळ होते. सकाळी दव, धुके पडले तरी फुलगळ होते. नसलेल्या पिकाच्या च्या व्हरायटी जर नेट मध्ये लावल्या तरी एकही फुल सेटिंग होत नाही. सेंथेटिक पायरेथ्रईड गटातिल कीटकनाशके च्या फवारणी मुळे जसे कराटे ,सायपरमेथ्रीन २५% यांच्या फवारणी मुळे देखील फुलगळ होते.

फुलगळ, फळगळीची महत्वाची कारणे

१) कमकुवत परागीभवन २) अपुरा किंवा गरजेपेक्षा जास्त प्रकाश ३) जमिनीचा कमी सुपीकता ४) बुरशी किंवा किडींचा प्रादुर्भाव त्यामुळे झाडावर झालेला परिणाम ५) अनेक झाडांमध्ये फुलकळी निघाल्यानंतर ५० तासांच्या आत परागीभवन न झाल्यास फुलगळ होऊ शकते. ६) जमिनीत व परिणामी झाडात नायट्रोजनचे प्रमाण जास्त झाल्यास ७) झाडाला पाणी कमी पडल्यास किंवा जास्त झाल्यास ८) हवेचा वेग खूप जास्त असल्यास ९) झाड हाताळताना झाडाला काही इजा झाल्यास १०) हवेतील आर्द्रता ४०% पेक्षा कमी अथवा ७०% पेक्षा जास्त झाल्यास ११) फुलकळी निघण्याच्या वेळी झाडाला सूट न होणारे रासायनिक औषध फवारल्यास १२) झाडाला फॉस्फरस कमी पडल्यास १३) दिवसाच्या व रात्रीच्या तापमानात खूप तफावत असल्यास



# आले लागवड तंत्रज्ञानाने शेतीची भरभराट

आले या वनस्पतीची लागवड पौराणिक काळापासून केली जाते. आल्यातील विशिष्ट चव व स्वाद यामुळे दररोजच्या जेवणातील मसाल्यात आल्याचे महत्वाचे स्थान आहे. ओले आले, प्रक्रिया करून टिकवलेले आले अथवा सुंठ अशा स्वरुपात आल्याचा उपयोग करतात. जमिनीतील आल्याच्या खोडाचा उपयोग मसाल्यासाठी करतात.

हवामान व जमीन : आल्याला उष्ण व दमट हवामान मानवते. थंडीमुळे आल्याची पानेवाढ थांबते व जमिनीत खोडाची वाढ सुरु होते. मात्र शेतकऱ्यांच्या अनुभवावरून असेही लक्षात आले की, साताऱ्यापासून मराठवाड्यापर्यंत पीक येऊ शकते. समुद्रकिनाऱ्याच्या भागात जेथे २०० से. मी. किंवा थोडा जास्तच पाऊस पडतो तेथे पावसाळी पाण्यावर आले घेतले जाते. समुद्रसपाटी पासून १०० ते १५०० मीटर उंचीपर्यंतच्या प्रदेशात आल्याची लागवड करण्यात येते. आल्यासाठी मध्यम खोलीची उत्तम निचरा असलेली कसदार जमीन उत्तम असते. नदीकाठच्या पोयटाच्या गाळ मिश्रित जमिनीत आले उत्तम येते. जमिनीवर पाणी तुंबून राहिलेले ह्या पिकास नुकसानकारक असते. तसेच जमिनीत विम्लतेचे प्रमाण जास्त नसावे.



एकाच जमिनीत मात्र वरचेवर आले घेऊ नये कारण त्यावर येणाऱ्या मर रोगाचे नियंत्रण अवघड जाते.

पूर्वमशागत : आल्याचे गड्डे जमिनीत वाढत असल्यामुळे सखोल पूर्वमशागत करणे गरजेचे असते. जमीन लोखंडी नांगराने ३०-४० सेमी. खोल उभी आडवी नांगरून घ्यावी. ३ - ४ कुळवाच्या पाळ्या देऊन माती भूशभुशीत करून घ्यावी. या पिकाच्या लागवडीसाठी जमिनीची आखणी निरनिराळ्या पद्धतीने केली जाते. हलक्या जमिनीत सपाट वाफे पध्दत, मध्यम व भारी जमिनीत सऱ्यावरंबे पध्दत वापरतात.

जमिनीत हेक्टरी ४० गाड्यापर्यंत (२० टन) शेणखत टाकावे. महाराष्ट्रातील काळ्या जमिनीत रुंद वरंब्याची पध्दत फायदेशीर ठरली आहे. सपाट वाफे ३ २ मीटर आकाराचे करतात. दोन वरंब्यात ६० से. मी. अंतर ठेवतात तर गादी वाफ्यावर लागवड करताना ३ १ मीटर आकाराच्या १५-२० से.मी. उंच वाफ्यावर लागवड करतात.

काढणी व उत्पादन : आल्याचे पीक ७ महिन्यात तयार होते. मात्र आले सुन्ठीकरता लावले असल्यास ८.५ ते ९ महिन्यात पीक तयार होते. जानेवारी महिन्यात पाने पिवळी पडून वाळू लागतात. वाळलेला पाला कापून पाला पाचोळा वेचून घ्यावा. कुदळीने खोदून आल्याच्या गड्डयांची काढणी करतात. खणताना गड्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. आले वेचून पाण्याने स्वच्छ धुवून गड्डे व बोटे (नवीन आले) वेगवेगळी करावी. हेक्टरी उत्पादन १०-१५ टनापर्यंत येऊ शकते. काढण्याच्या वेळी चागला भाव नसेल तर आले न काढता त्यास दर १० दिवसनी पाणी देणे चालु ठेवतात. एप्रिल अखेर कंदावर पुन्हा फुटवे येऊन त्याची वाढ सुरु होते. त्यानंतर त्यास वाढ व पोषणासाठी आधीच्या पोषणाइतकीच खते द्यावीत. अशा द्वी हंगामी पीकही काढणी पुढील ऑगस्टमध्ये करतात. या पिकाचे उत्पादन हेक्टरी ३० ते ४० टनापर्यंत येते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८१ : विल्यम हर्षेल याने युरेनसचा शोध लावला.
१८५४ : नागपूर रियासतीची समाप्ती झाली.
१८९७ : सॅन डीयेगो विद्यापीठाची स्थापना झाली.
१९१० : पॅरिसहुन लंडनला येताच स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अटक झाली.
१९२८ : कुमारी नॅन्सी मिलरचा हिंदू धर्मात प्रवेश झाला
१९३० : क्लाईड डब्ल्यू. टॉमबॉग या शास्त्रज्ञाने प्लूटो ग्रह शोधल्याचे हारवर्ड कॉलेज येथील वेधशाळेला कळवले. मात्र या ग्रहाचा शोध त्याला १८ फेब्रुवारी १९३० या दिवशीच लागला होता.
१९४० : अमृतसर येथील जालियनवाला बाग हत्याकांडाचे समर्थन करणारे पंजाबचे गव्हर्नर मायकेल ओडवायर यांची उधमसिंग यांनी गोळया घालून हत्या केली.
१९६३ : अर्जुन पुरस्काराची सुरुवात
१९९७ : कोलकात्यातील मिशनरीज् ऑफ चॅरिटीने मदर तेरेसांची वारस म्हणून सिस्टर निर्मला यांची निवड केली.
१९९७ : मदर तेरेसा यांचे वारस म्हणून कोलकात्यातील 'मिशनरीज ऑफ चॅरिटीज' ने सिस्टर निर्मला यांची नियुक्ती केली.
१९९९ : जलाशयाच्या तळाला भोक पाडून त्यातील पाणी बोगद्याच्या साह्याने भूमिगत जलविद्युतगृअहात नेऊन त्याद्वारे वीजनिर्मिती करणाऱ्या आशिया खंडातील पहिल्या प्रयोगाच्याकोयना जलविद्युत प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्याचे उद्घाटन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३३ : जोसेफ प्रिस्टले - इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ६ फेब्रुवारी १८०४)
१८९३ : डॉ. वासुदेव विष्णू मिराशी - महामहोपाध्याय, संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक (मृत्यू: ३ एप्रिल १९८५)
१८९९ : हैदराबाद राज्याचे पहिले मुख्यमंत्री डॉ. बर्गुला रामकृष्ण राव यांचा जन्मदिवस.
१९२६ : रविन्द्र पिंगे - ललित लेखक (मृत्यू: १७ आक्टोबर २००८)
१९७१ : हिंदी भाषिक कवी आत्मा रंजन यांचा जन्मदिन.
१९८० : भारतीय राजकारणी नेता, भारतीय लोकसभा सदस्य आणि संजय गांधी यांचे पुत्र वरून गांधी यांचा जन्मदिवस.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८०० : बाळाजी जनार्दन भानू उर्फ 'नाना फडणवीस' - पेशव्यांच्या दरबारी असणारे मराठा साम्राज्यातील मुत्सद्दी, पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी हे अर्धे शहाणे. (जन्म: १२ फेब्रुवारी १७४२ सातारा)
१८९९ : दत्तात्रेय कोंडो घाटे ऊर्फ 'कवी दत्त' (जन्म: २७ जून १८७५)
१९०१ : बेंजामिन हॅरिसन - अमेरिकेचे वे३३ राष्ट्राध्यक्ष (जन्म: १८३३)
१९५५ : वीर विक्रम शाह 'त्रिभुवन' - नेपाळचे राजे (जन्म: १९०६)
१९६७ : सर फँक वॉरेल - वेस्ट इंडिजचे क्रिकेट खेळाडू (जन्म: १९२४)
१९६९ : मोहिनीराज लक्ष्मण दत्तात्रय, - भारतीय गणितशास्त्रज्ञ.
१९९४ : श्रीपाद यशवंत कोल्हटकर - मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व 'सिटू' या कामगार संघटनेचे लढवय्ये नेते.
१९९६ : शफी इनामदार - अभिनेते व नाट्यनिर्माते (जन्म: १९४५)
१९९७ : शीला इराणी - राष्ट्रीय महिला हॉकी खेळाडू व संघटक.
२००२ : भारतीय चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, आणि पटकथा लेखक मोहम्मद नासिर हुसेन खान यांचे निधन.
२००४ : उस्ताद विलायत खाँ - सतारवादक (जन्म: २८ ऑगस्ट १९२८)
२००६ : चिकन नुग्गेत चे निर्माते रॉबर्ट सी बेकर यांचे निधन. (जन्म: २९ डिसेंबर १९२१).

# ऊस तोडणी मशिनचे वाहतूक, तोडणी दर वाढवा; साखर आयुक्तालयासमोर आंदोलन




पुणे : ऊस तोडणी मशिनचे दर वाढवून देण्यासाठी समिती गठित करावी, वाहतूक दर वाढवावा यांसह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ऊस तोडणी मशिन मालक संघटनेने पुण्यातील साखर आयुक्त कार्यालयासमोर सोमवारपासून (दि. १०) आंदोलन सुरू केले आहे.

मागण्या मान्य न केल्यास साखर आयुक्तालयाला तोडणी मशिनसह घेराव घालण्याचा इशारा संघटनेचे अध्यक्ष संजय साळुंखे यांनी दिली. आंदोलनात महाराष्ट्र राज्य ऊस तोडणी मशिन मालक संघटनेचे उपाध्यक्ष प्रभाकर भीमेवार, युवराज पाटील, अमोलराजे जाधव, सुभाष सातारकर, शरद चव्हाण, अमोल पवार, प्रभाकर चव्हाण, संतोष पोटे, संभाजी कदम असे मशिन मालक सहभागी झाले आहेत. साळुंखे म्हणाले, की कृषी क्षेत्रातील प्रोत्साहनपर योजनांमुळे कृषी यांत्रिकीकरणात गतीने वाढ झालेली आहे. यामुळे सध्या महाराष्ट्रात १३०० मशिन कार्यरत आहेत, यातील काहींना अनुदान मिळाले आहे.

सन २०१८ पासून जवळपास ९०० मशिनला अनुदान मिळालेले नाही. आम्ही सन २०१९ पासून वेगवेगळ्या स्तरावरून आंदोलने, भेटीगाठी केल्या. परंतु ठोस निर्णय काहीच झाला नाही. सध्या सन २०२४-२०२५ चा हंगाम संपलेला आहे. आता मशिन चालविण्यासाठी लागणाऱ्या डिझेलचे दर तसेच इतरही खर्च वाढलेले आहेत.

# बौद्धगया बौद्धांची ताबा मात्र इतरांचा बोधगया मंदिर अधिनियम १९४९ रद्द करण्यासाठी आंदोलन

## भारतीय बौद्ध महासभेचे नियमबद्ध रॅलीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

सम्राट अशोक यांनी इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात महाबोधी महाविहाराचे बांधकाम केले. तथागत बुद्धाला ज्या बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. त्यामुळे देशातील नव्हे, तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खू आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात मात्र या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आजही बौद्धांच्या ताब्यात नाही. महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, यासाठी १९९२पासून आंदोलन होत आहेत. तरी सुद्धा महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा बदलण्यात आला नाही. त्यामुळे पाच हिंदू धर्मीय ह्यांचे प्राबल्य असल्याने बौध्द गया येथील महाविहार येथे पंडे आणि ब्राम्हणवादी पुजा आणि कर्मकांड करीत असतात. त्यामुळे ज्या रूढी परंपरा ह्यांना तथागत गौतम बुद्ध ह्यांनी नाकारले तीच कर्मकांड येथे सुरू आहेत.

जागतिक वारसा म्हणून मान्यता प्राप्त बौध्द गया येथील महाविहार व्यवस्थापन कायदा तातडीने बदलण्यात यावा अशी आमची मागणी आहे. याकरीता सदर आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू ॲड. प्रकाश आंबेडकर तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शन व आवाहनानुसार तसेच भारतीय बौद्ध महासभा




राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भिमराव आंबेडकर यांच्या पुढाकाराने तसेच समता सैनिक दल व विविध बौद्ध संघटना यांच्यावतीने आज दि. १२ मार्च २०२५ रोजी देशभरातील बौद्धांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडीच्यावतीने संयुक्तरित्या आंदोलन करीत आहोत.

१) महाबोधी महाविहार (बोधगया, बिहार) हे पवित्र बौद्ध धर्मस्थळ असून, बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करावा. २) बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना सोबत घेऊन बौद्धांच्या ताब्यात द्यावे. ३) जागतिक वारसा अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात विशेष विकास निधी आणि सुविधा तात्काळ देण्यात याव्यात. आपला देश स्वातंत्र्य झाल्यावर २६ जानेवारी १९५० पासून घटना लागू झाली आहे. त्यावेळी भारतीय राज्यघटनेचे कलम १३ नुसार घटना लागू होण्यापूर्वी केलेले सर्व कायदे आणि नियम निरस्त केले आहेत. मात्र तरी देखील देशात १९४९ चा नियमबाह्य कायदा लावून बौध्द समूहाचे धार्मिक अधिकार काढून घेण्यात आले आहेत. आपण देशाच्या प्रमुख आहात, याकरीता केंद्र सरकार आणि बिहार सरकारने आपले विशेष अधिकार वापरून १९४९ चा कायदा दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात यावा यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे पूर्ण टीम, समता सैनिक दलाचे कॅप्टन आठवले, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, युवक अध्यक्ष आनुरथ वीर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अनिताताई चक्रे, अर्जुन जंवजाळ, पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर, राजाभाऊ महुवाले, सचिन मेघदंबर, मिलिंद सरपते, प्रेम कांबळे,दिलीप माने, बाळासाहेब गायकवाड, श्रीकांत वाघमारे, किरण वाघमारे, देविदास वाघमारे, संदीप जाधव, भीमराव पायाळ, भीमराव अवसरमल, आकाश साबळे, बनसोडे पीव्ही, सरवदे केके, विष्णू देवकते, संदीप रोकडे, राजेंद्र पोकळे, पप्पू गायकवाड, सुधीर मिसळे, गौतम चोपडे, भारत तांगडे, राजेश कुमार जोगदंड, लखन जोगदंड, भोले गुलाब, पुष्पाताई तुरुकमाने, अरुणाताई निसर्गंध, सुजाता वासनिक, प्रतिभा वाघमारे, नंदा भंडारे, यांच्या सह असंख्य समाज बांधव उपस्थित होता.

# सिंचनाअभावी शेतकऱ्यांची दुर्दशा–कोळेकर महाराज

## दहाव्या दिवशी शेतकऱ्यांचे उपोषण सुरू



बीड, प्रतिनिधी

शेती सिंचनासाठी आपल्याकडे बारमाही सुविधा नसल्याने शेतकऱ्यांच्या नशिबी दुर्दशा असल्याचे प्रतिपादन ह भ प गणेश महाराज कोळेकर यांनी केले. गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे शेतकऱ्यांच्या उपोषण स्थळी आयोजित हरी कीर्तनात बोलत होते.

यावेळी राजेसाहेब काका पवळ, भाऊसाहेब जरांगे पाटील, देविदास चव्हाण, महादेव रडे, दिनेश गुळवे, गणेश जाधव, बालासाहेब शेरकर, अंकुश परदेशी, रंगनाथ पाबळे, महेश गिराम, कैलास रडे सर, सरपंच दत्तात्रय कोळेकर, बलीराम मापारे, मुकुंद जाधव, मुकुंद परदेशी, संतोष रडे, बाबुराव पवळ, भाऊसाहेब जोशी, परमेश्वर महाराज जाधव, गोरख पवळ, ज्ञानेश्वर माऊली गायकवाड, रामेश्वर जाधव, किशोर रडे. अनिकेत कांगडे, बाळू महाराज पवार, भास्करराव खांडे, कृष्णा टाकसाळ आदी उपस्थित होते. जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावेत, जायकवाडीच्या उजव्या कालव्यातून उपकालवा करावा आदी मागण्यासाठी गेल्या दहा दिवसांपासून सिरसमार्ग येथे १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत उपोषण सुरू केले आहे. या उपोषण स्थळी रात्री लोकजागृती पर कीर्तन होत आहेत. मंगळवारी रात्री ह भ प गणेश महाराज कोळेकर यांचे कीर्तन झाले. कीर्तनात बोलताना गणेश महाराज कोळेकर म्हणाले की आपल्या भागामध्ये शेतीला बारमाही सिंचनाची सोय नाही यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होत नाही. शेतीला बारमाही पाणी मिळत नसल्याने ऊस फळबाग असे पिके घेता येत नाहीत, यामुळे वारंवार शेती तोट्यात जाते याचा परिणाम शेतकऱ्यांच्या कुटुंबावर होतो. शेतकरी आत्महत्या बेरोजगारी स्थलांतर कर्जबाजारीपणा ही सर्व प्रश्न शेतीला बारामाही पाण्याची सोय नसल्याने होतात. शासन वारंवार सिंचन सुविधा करू असे म्हणत असले तरी अर्थसंकल्पात मात्र काहीच तरतूद नसल्याने शेतकऱ्यांच्या नशिबी पाण्याचा दुष्काळ कायम आहे. शेतकऱ्यांनी सुरू केलेली उपोषणाची दखल शासनाने घ्यावी व सिंदफणा पट्टा पाणीदार करण्यासाठी निधीची तरतूद करत नवनवीन योजना राबविण्यात असेही शेवटी गणेश महाराज कोळेकर म्हणाले.

# जिल्ह्यातील शाळा दुपारच्या सत्रात बेकादेशीर रितीने बंद

## गावकऱ्यांनो, पंचनामे करा –ॲड. देशमुख

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा वेगवेगळ्या कामासाठी सातत्याने गाजत असतो. प्रशासन चांगले चाललेले आहे, हे फक्त कागदावर दाखवण्यात काही अधिकारी लक्ष घालतात. मात्र प्रत्यक्षात आपल्या खाली किती अंधार आहे ? हे पाहिले जात नाही. जिल्ह्यातील अनेक शाळा दुपारच्या सत्रात एक मार्च २०२५ पासून बंद असतानाही कुठलीही कारवाई होत नाही. विद्यार्थ्यांच्या नुकसानीकडे कोण पाहणार ? असा प्रश्न उपस्थित करत प्रत्येक गावातील शालेय शिक्षण समिती, सरपंच आणि गावकऱ्यांनी बंद शाळेचे पंचनामे करून शिक्षकांवर कारवाईची मागणी करावी, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी केली आहे.


यासंदर्भात कुर्ला तालुका बीड येथील तुषार पाटील व अन्य गावकऱ्यांसह इतर काही गावातील लेखी व तोंडी तक्रार देखील प्रशासनाकडे पोहोचलेल्या आहेत. शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे या तक्रारी दिलेल्या आहेत. शिक्षणाची वाट लावणे, ही गंभीर बाब असताना वरिष्ठ अधिकारी मात्र या तक्रारीकडे गांभीर्याने पाहत नाहीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांना जागेवर आणण्यासाठी प्रत्येक गावातील गावकऱ्यांनी आपापल्या परीने बंद शाळांचे पंचनामे करणे, त्याचप्रमाणे अँगल कॅम कॅमेरा मध्ये वेळ, तारीख आणि इतर सर्व माहितीसह फोटो घेऊन संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याची मागणी करावी. शिक्षण हे वाघिणीचे दूध म्हटलं जातं. मात्र दहावी आणि बारावीच्या परीक्षा पाहता परीक्षेतील कॉपी मुळे शिक्षणाचा दर्जा ढासळलेला आहे. त्यातच आता शाळा बंद ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अचानक फेरफटका मारला आणि विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले तर त्यांना गुणाकार, भागाकार अशा मूलभूत क्रिया देखील येत नाहीत. त्याचप्रमाणे इंग्रजीचा आणि विद्यार्थ्यांचा अनेक ठिकाणी गंध नाही. हे देखील दिसून येईल. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा ढासळव होणार्या या दोषी शिक्षकांवर कारवाई करून त्यांचे पगार कपात करावेत, अशी मागणी ही ॲड. देशमुख यांनी केली आहे.

# वयोवृद्ध आजबे दांमपत्याची फरफट; पुढारी नातवानेच केली फसवणूक

## गोड बोलून जमिन विकली परंतु पैसे देण्यास टाळाटाळ

बीड । प्रतिनिधी

दोन्ही मुले वारली.वयोवृद्ध आजबे दाम्पत्याच्या जमिनीची गाव पुढारी असणाऱ्या नातवाने ( मुलीच्या मुलाने) गोड बोलून विक्री करून आलेला पैसा स्वतःच्या खात्यावर जमा केला. आजोबांनी वारंवार नातवाला पैशाची मागणी करूनही गाव पुढारी नातवाने आज देतो, उद्या देतो म्हणत २ वर्षांपासून टाळाटाळ करत आहे. मुलीच्या मुलांकडे जमिन विकुन पैसे दिल्याने मुलाचा मुलगाही सांभाळ करत नाही. त्यामुळे वयोवृद्ध आजबे दांमपत्य अत्यंत हलाखीच्या परिस्थीतुन जात असुन या वयात काही करता येत नाही,पोट भरायचे कसं?? असा प्रश्न पडला असुन आमची अडचण सोडवा अशी कैफियत



सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना मांडली.

सिताराम संभाजी आजबे वय ९० वर्षे मुळचे राहणार ब्रम्हगाव ता.आष्टी जि.बीड. त्यांना २ मुले आणि ४ मुली. त्यांची त्याठिकाणी साडे ३ एक्कर जमिन होती. जमिनीच्या भांडणात भावकीच्या माणसांनी मोठा मुलगा ज्ञानेश्वर याचा खुन केला. दुसरा मुलगा उत्तम भावकीच्या भितीने आजोळी टाकळगव्हाण ता.गेवराई याठिकाणी राहु लागला.६ वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाले. त्यांना ४ मुली असुन दोन मुली बीड तालुक्यातील बेलगाव आणि सोमनाथ वाडी या ठिकाणी तर दोन मुली पाटोदा तालुक्यातील मंगेवाडी आणि डोमरी ( रोहतवाडी) याठिकाणी दिलेल्या आहेत. ४ वर्षांपूर्वी सोमनाथवाडी येथील गाव पुढारी नातवाने गोड बोलून माझी साडे ३ एक्कर जमिन विकायला लावली. जमिन विकुन आलेले २० लाख रुपये स्वतःच्या खात्यावर टाकले. नंतर आम्ही पैसे मागितल्यावर आज देतो.उद्या देतो म्हणून टाळाटाळ केली. २ वर्षांपूर्वी टाकळगव्हाण येथील मुलाने आग्रह धरल्याने ६ लाख रुपये दिले. त्याचं नातवाने ट्रॅक्टर घेतले. लाख रूपये मध्यंतरी दवाखान्यासाठी दिले. मात्र २ वर्षांपासून उर्वरित १२ लाख रुपये द्यायला टाळाटाळ करत आहे. मला चालता येत नाही. टाकळगव्हाण येथुन ३००० रुपये गाडी भाडे करून. सोमनाथवाडीला यावं लागतं. अशा १० –१२ वेळा चकरा मारल्या आहेत. दोघांच्या नावाने दिलेले प्रत्येकी ५ लाख रूपयांचे चेक आहेत.पण बँक वाले म्हणतात खात्यात पैसेच नाहीत.द्यायचे कुठुन? मुलीच्या मुलांकडे जमीन विकुन पैसे दिल्याने मुलाचा मुलगा आम्हाला सांभाळीत नाही. आम्हाला काम होत नाही, आम्ही जगायचं कसं ?? असा उद्विग्न सवाल सिताराम संभाजी आजबे यांनी करत आहेत.

# परिवर्तन इंग्लिश स्कूलने ग्रामीण भागातील मुलांना चांगले संस्कार दिले– राजेंद्र मस्के



बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाली येथील परिवर्तन इंग्लिश स्कूलच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यात आले या कार्यक्रमासाठी पाली परिसरातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

ग्रामीण भागामध्ये मुलांना उत्कृष्ट शिक्षण मिळावे यासाठी प्रा. अशोक शिंदे सर यांनी परिवर्तन इंग्लिश स्कूल ची सुरुवात करून विद्यार्थ्यांना इंग्लिश चे शिक्षण देण्यासाठी परिवर्तन संकुल उभा केली आहे. शिंदे सरांची मेहनत आणि जिद्द व चिकाटी यांच्या वरती मुलांसह पालकांचा विश्वास संपादन केल्याचे दिसत आहे. पालकांनी देखील त्यावर विश्वास दाखवून आपले मुले त्या ठिकाणी शिक्षणासाठी शाळेत दाखल केले आहेत.आज शाळेच्या विद्यार्थ्यांची पटसंख्या ही वर्षानुवर्ष वाढत जाताना दिसत आहे, यामुळे परिवर्तन इंग्लिश स्कूल ची उन्नती झाल्याचे आपल्याला पाहाव्यास मिळत आहे, या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी शेकडो विद्यार्थीनी सहभाग घेऊन आपल्या कलागुणांना वाव देण्याचे काम केले आहे,यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला सरपंच अंबादास गुजर, सरपंच सुशेन खरसाडे ,सरपंच मंजुषाताई नवले,बद्रीनाथ जटाळ ,लक्ष्मण नवले सह पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा. कावेरी खुरणे यांची तालुका अध्यक्षपदी नियुक्ती

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या मराठी विभागात कार्यरत प्रा. कावेरी खुरणे यांची कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी प्राध्यापक महासंघाच्या पाटोदा तालुका अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे.

नुकतीच महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी प्राध्यापक महासंघाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली त्यात पाटोदा तालुका अध्यक्षपदी प्रा. कावेरी खुरणे यांची नियुक्ती करण्यात आली. मराठी भाषा विषय महासंघाचे राज्याध्यक्ष प्रा. सुनिल डिसले, राज्य कार्याध्यक्ष प्रा. संपतराव गर्जे, राज्य कार्याध्यक्ष डॉ. मनिषा रिठे, राज्य सचिव प्रा. बाळासाहेब माने, बीड जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. अशोक देवगुडे,



सचिव प्रा. बिभिषण चाटे यांच्या उपस्थितीत सदरील नियुक्ती करण्यात आली.या नियुक्तीबद्दल प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या हस्ते प्रा. खुरणे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील सर्व पदाधिकारी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रा. कावेरी खुरणे यांचे अभिनंदन केले आहे.त्यांच्या या उपलब्धिबद्दल संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारिका क्षीरसागर यांनी प्रा. खुरणे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.


### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३७६/२०२५**
**ॲड. खाडे एस.डी.**
**धरमसिंग विरुध्द निरंक**

अर्जदार :- १) धरमसिंग पि. नारायणसिंग ठाकूर वय ६४ वर्षे धंदा शेती, रा. कटकटपुरा, जुनी भाजीमंडई, अशोक टॉकीज जवळ, बीड ता.जि.बीड , २) सुरज पि.धरमसिंग ठाकूर वय ३५ वर्षे धंदा व्यवसाय रा. सदर

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे शोभाबाई भ्र. धरमसिंग ठाकूर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत नामे शोभाबाई भ्र. धरमसिंग ठाकूर रा. कटकटपुरा, जुनी भाजीमंडई, अशोक टॉकीज जवळ, बीड ता. जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : १९.११.२०२४ रोजी सूर्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल क्रिटीकल केअर यूनिट, बीड ता.जि.बीड येथे झाला. अर्जदार क्र १ हे मयताचे पती आहेत. अर्जदार क्र २ हा मयताचा मुलगा आहे. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शोभाबाई भ्र. धरमसिंग ठाकूर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक २२/०४/२०२५**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
**क लिपीक**

शिक्का



### जाहीर प्रगटन

**मा. श्री. अ.सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. २६/२०२५**
**ॲड. आर. के. बडे**
**रत्नमाला वि. निल**

अर्जदारः १. रत्नमाला संजय बडे वय ४९ वर्षे, धंदा–घरकाम २. शशांक संजय बडे वय–२४ वर्षे, धंदा शेती ३. रूख्मीणबाई उर्फ रखमाबाई खुशालराव बडे वय–८० वर्षे, धंदा–घरकाम सर्व राहणार लोणी, ता. शिरूर का. जि. बीड

अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत. ज्यापेक्षा मयत संजय खुशालराव बडे, यांचा मृत्यू दि. १८.०४.२००२ रोजी मौजे. लोणी, ता.शिरुर कासार, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आज दिनांक ०१.०३.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १५.०४.२०२५ ही आहे.**

आदेशावरून
स्वाक्षरित
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर. शिरूर का.

स्वाक्षरित
**क लिपीक**

शिक्का


# मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेकडे देण्याचा निर्णय सरकारने मागे घ्यावा

## जिल्हाधिकारी यांना पेन भेट देवून लेखणी बंद आंदोलन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा आहे. हा निर्णय सरकारने मागे घ्यावा असे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. त्यांना प्रतिकात्मक स्वरूपात पेन देऊन लेखणी बंद आंदोलन पत्रकारांनी केले. यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय बाहेर सरकारच्या विरोधात निदर्शने करून न्याय हक्काची मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा बीडच्या वतीने करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजय भोकरे साहेब, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, राज्य समन्वयक नितीन शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पत्रकार संघाचे




### जिल्हाधिकारी यांच्यासमोर लेखणी बंद आंदोलन

महाराष्ट्र राज्याचे पहिले माजी मुख्यमंत्री संवेदनशील आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीचे औचित्य साधून बुधवार दिनांक १२ मार्च २०२५ रोजी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेब यांना प्रतीकात्मक स्वरूपात पेन भेट देऊन पत्रकारांनी आपले अनोखे लेखणी बंद आंदोलन केले.

प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे साहेब यांच्या संकल्पनेनुसार पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत सरकारला जिल्हाधिकारी यांच्या मार्फत बीड जिल्हा शाखेच्या वतीने मीडिया मॉनिटरिंग खाजगी संस्थेकडे देण्याचा निर्णय सरकारने मागे घ्यावा अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. या निवेदनात पुढे म्हटले आहे की, पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हा आहे.मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेमण्याचा निर्णय घेतल्याने बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई या निर्णयाला तीव्र विरोध करत आहे. सरकारने पारदर्शकता न ठेवता खासगी संस्थेला हे काम सोपवणे म्हणजे माध्यमांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष प्रयत्न आहे. सरकार कडून लादली गेलेली ही अघोषित आणीबाणी त्वरित मागे घ्यावी असे निवेदन बीडचे जिल्हाधिकारी श्री अविनाश पाठक यांना महाराष्ट्राचे संवेदशील आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्व. यशवंतराव चव्हाण (मा. मुख्यमंत्री) यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून बुधवार दिनांक १२ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता देण्यात आले.

# निश्चय नैसर्गिक रंगाच्या होळीचा! संकल्प वसुंधरेच्या रक्षणाचा!

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडेंनी दिल्या, मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पर्यावरणस्नेही होळीच्या शुभेच्छा

**मुंबई । प्रतिनिधी**

होळी व धुलीवंदना निमित्त सर्वांनी पर्यावरणपूरक होळी साजरी करावी या उपक्रमाच्या अनुषंगाने आज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पर्यावरणपूरक पाच रंगाचा समावेश असलेले पॅकेट देऊन पर्यावरणस्नेही होळी साजरी करण्याच्या शुभेच्छा दिल्या.

होळी व धुलीवंदन तसेच रंगपंचमी हा सण राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा केले जाते. रंग खेळताना ते पर्यावरण व नैसर्गिक असावेत, यासाठी जनजागृती





आवश्यक आहे. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या वतीने पर्यावरण पूरक होळी, धुलिवंदन व रंगपंचमी साजरी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनीही पर्यावरण पूरक होळी, रंगपंचमी व धुलिवंदन साजरी करण्याचे आवाहन केले आहे. याचाच एक भाग म्हणून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री श्रीमती मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सागर निवासस्थानी जाऊन तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांना विधानभवनात भेटून पर्यावरण पूरक रंगाचे पॅकेट देऊन शुभेच्छा दिल्या.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवारी सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील सातव्या पुण्यतिथी फाल्गुन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. महंत गुरूवर्य सुरेशानंदजी महाराज शास्त्री श्रीक्षेत्र शृंगऋषी गड यांचे गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व



समस्त गावकरी मंडळी ढेकणमोह ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## वडिलांचा धक्कादायक मृत्यू, रात्री अंत्यविधी, जड अंत:करणाने दहावीच्या पेपरला हजर

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

वडिलांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला, रविवारी रात्री अकरा वाजता अंत्यविधी झाला आणि मुलगा पृथ्वीराज तांगडे याने दुःखाचा प्रचंड डोंगर घेऊन दहावीची परीक्षा दिली.



कोणावर कधी-कशी दुःखाची वेळ येईल किंवा भयंकर असा प्रसंग येईल हे सांगता येत नाही. अशीच धक्कादायक घटना कडा येथे घडली. कडा येथील एक्स टेलर म्हणून परिसराला परिचित असलेले विजय तांगडे ( वय ४९ वर्षे ) यांचा रविवारी दुपारी तीन वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. क्षणात कुटुंबाचा आधार गेला, कुटुंबाला वडिलांचा आभाळा एवढा आधार असतो. वडिलांचा धक्कादायक मृत्यू झाल्याने कुटुंब उघड्यावर पडले. मुलगा पृथ्वीराज हा इयत्ता दहावीची परीक्षा देत आहे. कडा येथील पत्रकार राजेंद्र तांगडे यांचे विजय तांगडे हे कनिष्ठ बंधू होते. रविवारी रात्री अकरा वाजता विजय तांगडे यांच्या पार्थिवावर कडा येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मोतीलाल कोठारी विद्यालयात प्रवेशित असलेल्या पृथ्वीराजची परीक्षा कडा येथील श्रीराम विद्यालयात सुरू आहे. सोमवार दिनांक १० मार्च रोजी विज्ञान विषयाचा पेपर होता. प्रचंड दुःख झाल्याने पेपरला जावे की नाही अशा द्विधा मनस्थितीत पृथ्वीराज होता परंतु नातेवाईकांनी आधार देत त्याला समजावून सांगितले आणि त्याने मन घट्ट करीत परीक्षेचा पेपर दिला. परीक्षेसाठी असलेले पर्यवेक्षक श्री शिंदे यांनीही परीक्षा सुरू होण्यापूर्वी पृथ्वीराज यास समजावून सांगून आधार दिला. नातेवाईक, पर्यवेक्षक, केंद्रप्रमुख व मित्रपरिवार असा सर्वांनी दुःखद प्रसंगी आधार दिल्याने पृथ्वीराज यांनी दहावीचा पेपर व्यवस्थित दिला.

## लिनेस क्लब अंबाजोगाईच्या वतीने महिला दिनानिमित्त सफाई कामगार महिलांचा सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत, लिनेस क्लब अंबाजोगाई च्या वत ीने शहरातील सफाई कामगार महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. या उपक्रमाद्वारे समाजाच्या स्वच्छतेसाठी अविरत परिश्रम करणाऱ्या महिलांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

शहरातील सफाई कामगार महिला भल्या पहाटे कामावर येत शहराच्या स्वच्छतेची जबाबदारी काळजीपूर्वक पार



पाडत असतात. शहराच्या स्वच्छतेसाठी योगदान देणाऱ्या महिलांचा गौरव करून त्यांच्या कार्याची महत्त्वपूर्ण जाणीव समाजाला करून देण्याच्या हेतूने लिनेस क्लब अंबाजोगाई च्या वतीने त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. नगर परिषद परिसरात हा छोटेखानी सोहळा पार पडला. या कार्यक्रमात कांताबाई किसन समुकराव, शालुबाई वैद्य, लताबाई वाघमारे, वंदना सरवदे, केशरबाई जोगदंड या सफाई कामगारांचा प्रातिनिधिक स्वरुपात सन्मान करण्यात आला. यावेळी शहराच्या स्वच्छतेच्या व्यवस्थापनात मोलाचा वाटा असलेल्या अंबाजोगाई नगर परिषदेचे स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे यांचाही लिनेस क्लब अंबाजोगाईच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी महिलांच्या सन्मानासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## मानूरच्या उपसरपंचपदी मोहब्बत खान पठाण यांची बिनविरोध निवड

मानूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील श्रीक्षेत्र नागनाथ मानूर ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदाची निवडणूक काल दिनांक १२ मार्च रोजी बिनविरोध पार पडली. सरपंच अशोक मामा पाखरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवडणुकीत उपसरपंच पदी मोहब्बत खान समशेर खान पठाण यांची बिनविरोध निवड झाली .या बैठकीला ग्रामपंचायतचे सर्व १४ सदस्य उपस्थित होते. बिनविरोध निवड झाल्यानंतर सर्वांनी जाटवडच्या गोपीनाथ गडावर जाऊन आनंदोत्सव साजरा केला.



दोन वर्षापूर्वी मानूर ग्रामपंचायत पंचवार्षिक निवडणूक झाली या निवडणुकीत सरपंच पदी अशोक मामा पाखरे यांची जनतेतून प्रचंड मताधिक्याने निवड झाली होती त्याचवेळी उपसरपंच पदी श्रीमती सविता अर्जुन बनसोडे यांची निवड झाली दरम्यान श्रीमती बनसोडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या या पदाची निवडणूक १२ मार्च रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली ◀◀ पान ३ वर

### रमजानच्या पवित्र महिन्यात मुस्लिम समाजाला दिली संधी

रमजानचा पवित्र महिना सुरू असताना मानूर मध्ये सामाजिक सलोखा जपण्याचे काम सरपंच अशोक मामा पाखरे यांनी केले आहे. या गावात मुस्लिम समाजाचे तीन सदस्य असून त्यापैकी मोहब्बत खान पठाण यांना उपसरपंच पदी संधी देण्यात आली. मानूर या गावामध्ये नेहमीच सामाजिक सलोखा जपण्याचे काम झालेले आहे .हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समाजाचे लोक या गावात वर्षानुवर्ष सर्व प्रकारचे सण उत्सव एकत्रितपणे साजरे करतात. हाच सामाजिक सलोख्याचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम सरपंच अशोक मामा पाखरे यांनी केले आहे.

### लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचा आदर्श समोर ठेवला -सरपंच पाखरे

राजकारण आणि समाजकारण करताना सर्व जाती धर्माला सोबत घेऊन जाण्याचे काम करा असा संदेश लोकनेता पंकजाताई मुंडे यांनी नेहमी कार्यकर्त्यांना दिलेला आहे.त्यांचा आदर्श समोर ठेवून तसेच त्यांच्याच आदेशानुसार मानूर ग्रामपंचायत च्या उपसरपंच पदी मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व दिले असल्याचे सरपंच अशोक मामा पाखरे यांनी सांगितले.

## 'मैं हूँ स्वयं सिद्धा' पुरस्काराने सुनंदा मुंदडा सन्मानित

### बीड़ जिल्हा माहेश्वरी संघटन यांच्या वतीने झाला सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड़ जिल्हा माहेश्वरी संघटन यांच्या वतीने दिला जाणारा मैं हूँ स्वयं सिद्धा'' हा पुरस्कार येथील वसुंधरा महिला नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षा सुनंदा मुंदडा यांना प्रदान करण्यात आला.शाल,श्रीफळ,स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.


या कार्यक्रमासाठी प्रदेश माहेश्वरी महिला संघटनच्या अध्यक्षा सुनिता पल्लोड, बीड जिल्हा अध्यक्ष ललित तोष्णीवाल, सचिव जगदीश जाजू, बीड जिल्हा माहेश्वरी महिला अध्यक्ष पूनमजी जाजू ,



महाराष्ट्र माहेश्वरी महिला संघटनच्या विविध पदाधिकारी व बीड जिल्ह्यातील माहेश्वरी संघटनाच्या विविध पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.त्यांना मिळालेल्या या पुरस्कारा बद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

अपंगत्वावर मात करून केले केतृत्व सिद्ध एखाद्याची ◀◀ पान ३ वर

## पाटोदा ग्रामीण रुग्णालयात डॉ.जाधव व डॉ.ओमासे यांच्या टीमकडून शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी



**पाटोदा । प्रतिनिधी**

**केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांच्या माध्यमातून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य विभाग बीड सी एस डॉ अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा ग्रामीण रुग्णालयात प्रत्येक महिन्याच्या मंगळवारी बुधवारी सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया शिबीराचा आयोजन करण्यात येते.**



सदर शिबिरात ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथील डॉक्टर अभिषेक जाधव व एम एस सर्जन,डॉक्टर शुभांगी ओमासे भूलतज्ञ यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील टीम चांगल्या प्रकारे रुग्णांची सेवा करतात श्रीमती किशोरी डोरले,नागरे प्रियंका,आसमा मुजावर, सिस्टर व कर्मचारी सानप अर्जुन,सुनील लाड, देवराव राख,पवार सोपान, इत्यादी कर्मचाऱ्यांसह पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचारी रुग्णांना चांगली सेवा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करतात तसेच पाटोदा तालुक्यातील रुग्णांनी कुटुंब नियोजन, सांधेदुखी,हर्निया, अपेनडिक्स,मुतखडा,व इतर शस्त्रक्रियेसाठी बाहेर न जाता कोणत्याही महिन्यातील पहिल्या मंगळवार व बुधवारी आपल्या पाटोदा ग्रामीण रुग्णालयात शस्त्रक्रिया केली जात असल्याने ग्रामीण रुग्णालयाला संपर्क साधीत जावा आशे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ अभिषेक जाधव यांनी केले आहे.

## नाफेड शासकीय हमीभावाने तूर विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू -सभापती तांबोळी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी मतदार संघाचे लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथे शासकीय तुर खरेदी केंद्राला मंजुरी मिळाली असून सर्व शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नोंदणीसुरू झाली असून ऑनलाईन नोंदणी दि.२४ मार्च पर्यंत करून घ्यावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.७५५० प्रति क्विंटल दराने तुर खरेदी केली जाणार





आहे.

आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने कडा कृषी उत्पन्न बाजार समितीत नाफेड अंतर्गत दि महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन यांचे सेवा सहकारी सोसायटी लि. जामगाव ता.आष्टी या शासकीय हमीभाव तूर खरेदीकेंद्रांस मंजुरी मिळाली आहे. या हमीभाव केंद्रात ७५५० प्रति क्विंटल दराने तुर खरेदी केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी सातबारा व ८ अ मूळ प्रत,आधारकार्ड,बँक पासबुक (चालु खाते द्यावे,जनधन खाते देऊ नये),ऑनलाइन पिकपेरा नोंद असणे आवश्यक इत्यादी कागदपत्रासह प्रत्यक्ष येऊन नोंदणी करण्याचे आवाहन सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.तसेच लवकरच प्रत्यक्ष खरेदी सुरू होणार असून शेतकऱ्यांनी कमी दराने तुरीची विक्री न करण्याचे आवाहन केले आहे.

## सामाजिक सलोखा वाढीसाठी आजीनाथ गवळीं दिलेल्या हाकेला नागरीकांचा प्रतिसाद

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

गोमळवाडा येथे सामाजिक सलोख्याची हाक देत छ.शिवाजी महाराज,क्रांतीसुर्य महात्माफुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयूक्त जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली व यावेळी प्रथम स्व.संतोष देशमुख यांना श्रद्धांजली अर्पन करून या निमित्ताने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत ''छावा'' चित्रपटाचा शो दाखविण्यात आला.तर



### आपण सर्व माणूस व भारतीय म्हणून एकच आहोत-तहसीलदार सुरेश घोळवे

### गोमळवाडा येथे छ.शिवाजी महाराज,क्रांतीसुर्य महात्माफुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयूक्त जयंती उत्साहात साजरी

सामाजिक सलोखा वाढीसाठी आजीनाथ गवळीं दिलेल्या हाकेला नागरीकांचा उदंड प्रतिसादमिळाला.यावेळी संत-महंत,मान्यवर यांचेसह नागरीकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

सध्या जिल्हामधे जातीय सलोखा व सामाजिक वातावरण खूपच दुषित झालेले असून हे वातावरण बदल्याची गरज असून पुन्हा जातीय सलोखा निर्माण व्हावा या उद्देशाने छ.शिवाजी महाराज,क्रांतीसुर्य महात्माफुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयूक्त जयंती साजरी करून सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी सामाजिक सलोख्याची हाक देत कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाचे उदघाटन श्रीराम संस्थानचे महंत ह.भ.प.भानुदास महाराज शास्त्री यांच्या हस्ते झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार सुरेश घोळवे हे तर व्यासपिठावर ◀◀ पान ३ वर

## यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय विचाराची आज महाराष्ट्राला गरज -प्राध्यापक डॉ कल्पना घारगे

पाटोदा । प्रतिनिधी

जय भवानी महाविद्यालय यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजर पाटोदा पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागाच्या वतीने प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण साहेब यांची ११२ वी जयंती व साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या



लोकप्रशासन विभागाच्या विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर कल्पना घारगे या होत्या तर सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉक्टर रामकृष्ण प्रधान प्राध्यापक बापू घोक्षे डॉक्टर वंदनराव जाधव डॉक्टर प्राध्यापक सय्यद एस आर डॉक्टर सुनील जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते या कार्यक्रमात डॉक्टर कल्पना घारगे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महाराष्ट्रात आज वैचारिक राजकारणाची निर्माण करण्यासाठी ह आज यशवंतराव चव्हाण यांच्या नैतिक राजकीय ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष


# 'लाडक्या बहिणीं'ना अधिक निधी देण्याचे आश्वासन सरकारने पाळावे'; केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना लाडक्या बहिणींना दीड हजार रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने पूर्ण करावे, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.



पुणे दौऱ्यात ते पत्रकारांशी बोलत होते. रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव परशुराम वाडेकर, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, शहराध्यक्ष संजय सोनवणे, रोहिदास गायकवाड यांच्यासह इतर अनेक पदाधिकारी उपस्थित होते. लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर काहीसा ताण येत असला तरी देखील राज्य सरकारने तो ताण सहन करूनही लाडक्या बहिणींना अधिक निधी देण्याचे आश्वासन पाळावे, असे आवाहन आठवले यांनी यावेळी केले.

चालू आर्थिक वर्षाच्या आर्थिक अहवालानुसार राज्याच्या महसुली उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असल्याचे दिसून येत आहे. मात्र, येणाऱ्या काळात राज्याच्या महसुली उत्पन्नात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. दावोस येथे विविध उद्योगांशी झालेल्या करारानुसार राज्यात १५ लाख ९० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणार आहे. त्याचप्रमाणे इतर काही उपाययोजना करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळ राज्याच्या आर्थिक परिस्थितीत नक्कीच सुधारणा करेल, असा विश्वासही आठवले यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे काही निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केले आहेत. त्यामुळे शिंदे आणि फडणवीस यांच्यात तणाव असल्याचे वातावरण निर्माण केले जात आहे. प्रत्यक्षात शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात आणि सध्याच्या फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये देखील मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एकत्रितपणे चर्चा करून कोणताही निर्णय घेत असतात. त्यामुळे काही निर्णय रद्द केले असले तरी देखील त्याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या चर्चा झालेली असणार आहे. शिंदे आणि फडणवीस यांच्यात तणाव असल्याचे वृत्त चुकीचे आहे, असा दावाही आठवले यांनी केला.

अनेक पक्षांचे सरकार चालविताना एकमेकांमध्ये मतभेद असणे स्वाभाविक आहे. याचा अर्थ महायुतीतील घटक पक्ष एकमेकांवर नाराज आहेत असा होत नाही. रिपब्लिकन पक्षामध्ये देखील मंत्रिपद न मिळाल्यामुळे काही प्रमाणात अस्वस्थता आहे. मात्र, महायुतीचे आमदार मोठ्या संख्येने निवडून येण्यामध्ये रिपब्लिकन पक्ष आणि आंबेडकरी जनतेचा मोठा वाटा आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पक्षाला जागा मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी म्हटले.

# शिंद येथे छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त बलिदान मास

**भोर । प्रतिनिधी**

महुडे शिंद ( ता.भोर ) यथील शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान शिंद, व श्री वीर बाजी प्रभू प्रतिष्ठान शिंद च्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदाननिमित्त फाल्गुन प्रतिपदा ते फाल्गुन अमावस्या पर्यंत एक महिना बलिदान मास पाळण्यात येत आहे. बलिदान मासानिमित्त शिंद येथील श्री वीर बाजी प्रभू यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून शिवप्रतिष्ठानतर्फे रोज सायंकाळी 'सामुदायिक श्लोक पठण' करण्यात येत आहे. यामध्ये तरुण कार्यकर्ते उत्साहाने सहभागी होत आहेत.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त येत्या २९ मार्चला सकाळी आठ वाजता भोर येतील शिवतिर्थ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्हार अर्पण करून मूक पदयात्रा काढण्यात येणार असल्याचे गौरव शेडगे यांनी सांगितले



**श्री वीर बाजी प्रभू प्रतिष्ठान शिंद येथील तरुण शिवप्रेमी**
**छाया – स्वप्नीलकुमार पैलवान**

तरुण शिवप्रेमी व नागरिकांनी महाराजांना आदरांजली अर्पण करण्यासाठी मूक पदयात्रेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन शिवप्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# मंगलदास बांदल यांना ईडी कोर्टाकडून जामीन मंजूर; सहा महिन्यांनी येणार तुरुंगाबाहेर !

शिक्रापूर । प्रतिनिधी

शिरुर गावच्या सरपंच पदापासून आपल्या राजकारणाला सुरुवात करुन जिल्ह्याच्या राजकारणात सक्रीय झालेले पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य व बांधकाम विभागाचे माजी सभापती मंगलदास बांदल यांना ईडी ने अटक केल्यानंतर ईडीचे न्यायाधीश मिलिंद जाधव यांनी मंगलदास बांदल यांचा जामीन मंजूर केल्याने मंगलदास बांदल हे तब्बल सहा महिन्यानंतर कारागृहाबाहेर येणार असल्याने आता राजकीय व्यक्तींच्या भुवया उंचावल्या आहे.



पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य व बांधकाम विभागाचे माजी सभापती व राष्ट्रवादीचे मी प्रदेश उपाध्यक्ष असलेले मंगलदास बांदल हे पुणे जिल्ह्यातील एक वादळी व्यक्तीमत्व म्हणून परिचित असून ते प्रत्येक राजकीय पक्षाशी संधान ठेऊन असत, लोकसभा निवडणूकीसाठी वंचित आघाडीने उमेदवार म्हणून घोषित केले मात्र नंतर राजकीय उलथापालथ पाहून वंचित आघाडीने बांदल यांची उमेदवारी रद्द केली होती.

दरम्यान बांदल यांनी लोकसभा निवडणुकीत महायुतीचा प्रचार करत बारामती मतदारसंघातील प्रचारात थेट शरद पवार यांच्यावर तर कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांच्यावर टिकास्त्र सोडल्याने पवार कुटूंबावर टिका केल्याने राज्यभर टिकेचा विषय चर्चेत होता, तर २१ ऑगस्ट २०१४ रोजी बांदल यांच्या शिक्रापूर व महंमदवाडी या निवासस्थानी ईडीने कारवाई करत साडेपाच कोटी रक्कम हस्तगत करुन त्यांच्या ८५ कोटी किंमतीच्या मालमत्तांवर ईडीने टाच आणली.

तर मणीलॉडरींग तसेच अनेक गुन्हे बांदल यांच्यावर दाखल झाले होते. शिवाजीनगर बँक घोटाळा प्रकरणी बांदल यांनी २१ महिने तुरुंगवास भोगल्यानंतर ईडीच्या कारवाईत बांदल यांना ६ महिने कारावास भोगावा लागला आहे. नुकतेच मंगलदास बांदल यांच्या वतीने ॲड. अबाद फोंडा, ॲड. अदित्य सासवडे यांनी ईडी कोर्टात बाजू मांडली असताना ईडीचे न्यायाधीश मिलिंद जाधव यांनी मंगलदास बांदल यांचा जामीन मंजूर केल्याने मंगलदास बांदल हे तब्बल सहा महिन्यानंतर कारागृहाबाहेर येणार आहे.

**शिरुर तालुक्यात ठिकठिकाणी जल्लोष !**

मंगलदास बांदल यांना ईडीने जमीन मंजूर केल्याने बांदल यांचा कारागृहातून बाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाल्याने शिक्रापूर सह शिरुर तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत काहींनी सोशल मिडीयावर जल्लोष केला आहे.

# नांद ( खालचे ) शाळेचे घवघवीत यश

भोर । प्रतिनिधी

महूडे भोर तालुक्यात परसबाग निर्मिती स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा नांद ( खालचे ) सलग दुसऱ्यावर्षी प्रथम क्रमांक मिळविला आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या परसबाग निर्मिती स्पर्धेमध्ये भोर तालुक्यातून नांद खालचे शाळेने प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवले या यशाबद्दल भोर पंचायत समितीच्या शिक्षण विस्तार अधिकारी शेख मॅडम यांनी शाळेत भेट देऊन विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

बोलकी परसबाग, आजीबाईंचा बटवा ,ऑक्सिजन पार्क, मायक्रोग्रीन भाजीपाला, आठवडे बाजार या उपक्रमाबद्दल माहिती घेतली. प्रत्येक झाड, औषधी वनस्पती व भाजीपाला यांच्या नाम फलक आहेत. तसेच प्रत्येक झाडास क्यू आर कोड लावले आहेत. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर सदर वनस्पतींची ऑनलाइन शास्त्रीय माहिती



**शिक्षण विस्तार अधिकारी शेख यांनी बोलक्या परसबागेची माहिती घेताना. छाया – स्वप्नीलकुमार पैलवान**

आपल्याला पाहता येते. त्यांचे उपयोग जाणून घेता येतात. त्यामुळे परसबाग बोलकी असल्याची माहिती मुख्याध्यापक अविनाश कुचेकर यांनी दिली.

परसबागेमध्ये पालक, राजगिरा, मेथी ,कोथिंबीर यासारख्या पालेभाज्यांबरोबर टोमॅटो, वांगी, मिरची, दोडका, कारले, दुधी, भोपळा, शेवगा, घेवडा, बटाटा ,कांदे, कोबी, फ्लॉवर, ढोबळी मिरची या फळभाज्यांची लागवड केलेली आहे. दुपारच्या वेळी फावल्या वेळामध्ये विद्यार्थी परसबागेमध्ये आवडीने काम करून परसबागेचे व्यवस्थापन करतात. या परस बागेमध्ये सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला पिकवला जात असल्याबाबतची माहिती उपशिक्षिका पल्लवी गोसावी यांनी दिली .

शाळेतील मध्यान्ह भोजन योजनेत परसबागेतील पालेभाज्या चा वापर केला जात असल्याची माहिती स्वयंपाकी रेश्मा दुधाने यांनी सांगितले. रोजच्या वापरातून शिल्लक राहिलेला भाजीपाला दर शनिवारी शाळेतील आठवडे बाजारात विकला जातो. यातून मिळालेली रक्कम विद्यार्थी बचत बँकेमध्ये ठेवली जाते व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी त्याचा वापर करण्यात येतो.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेत नांद य शाळेने मिळवलेल्या या यशाबद्दल भोर तालुक्याचे गटविकास अधिकारी किरण कुमार धनवाडे, गटशिक्षणाधिकारी राजकुमार बामणे, शालेय पोषण आहार अधीक्षक सुधीर साने, केंद्रप्रमुख सुनिता गायकवाड, नांद गावच्या सरपंच सारिका विकास दुधाणे, उपसरपंच भगवान दुधाणे व ग्रामपंचायत सदस्य, माऊली दुधाणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष दुधाणे ,ग्रामस्थ यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व जिल्हा पातळीवरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# स्वारगेट अत्याचार प्रकरणात नवा ट्विस्ट; पुणे पोलिसांनी उचलले 'हे' मोठे पाऊल

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट बसस्थानकात घडलेल्या तरुणीवरील बलात्कारप्रकरणी विशेष सरकारी वकील म्हणून ड. अजय मिसार यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव पुणे पोलिसांनी राज्य सरकारकडे पाठवला आहे. हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न केले जाणार आहेत. त्यादृष्टीने पोलिसांकडून गुन्ह्याचा तपास व इतर नियोजन केले जात आहे.



स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये पंधरा दिवसांपुर्वी (दि. २५ फेब्रुवारी) २६ वर्षीय तरुणीवर धमकावून जबरदस्तीने बलात्कार केल्याची घटना घडली. तीन दिवसानंतर यातील आरोपी दत्तात्रय गाडे याला अटक केली. तो पोलीस कोठडीत आहे. बुधवारी त्याची पोलीस कोठडी संपत आहे. दरम्यान, याप्रकरणात आरोपीविरूद्ध जलदगतीने आरोपपत्र दाखल करण्यासाठी पोलिसांकडून कार्यवाही केली जात आहे. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी यासाठी विशेष सरकारी वकील नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ड. मिसार गुन्हेगारी कायद्यातील एक अनुभवी वकील असून, त्यांनी यापूर्वी अनेक गंभीर गुन्ह्यांत यशस्वीपणे बाजू मांडली आहे. त्यामुळे पोलिसांनी ॲड. मिसार यांची विशेष सरकारी वकिल म्हणून नियुक्ती करावी, असा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आहे. लवकरच यावर अंतिम निर्णय अपेक्षित आहे.

पुढील कायदेशीर प्रक्रिया

– पोलिसांकडून न्यायालयात चार्जशीट दाखल करण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे.

– विशेष सरकारी वकील नियुक्तीनंतर न्यायालयीन सुनावणी जलदगतीने पार पडेल.

– आरोपींविरुद्ध कठोर शिक्षा सुनावण्यासाठी ठोस पुरावे न्यायालयासमोर मांडले जातील.

सरोदेंच्या नेमणुकीची मागणी

स्वारगेट बलात्कार प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून ड. असीम सरोदे यांची नेमणूक करण्याची मागणी पीडित तरुणीने केली आहे. संदर्भात पीडितेने पुणे पोलीस आयुक्तांना पत्र पाठवले आहे. 'माझ्या मर्जीवर झालेला अत्याचार समजून घेण्यात बहुसंख्य लोकांनी असंवेदनशीलता दाखवली, तेव्हा ड. सरोदे यांनी माझ्यावरील अन्याय संवेदनशीलतेने समजून घेतला. हा खटला ड. सरोदे यांच्या कायदेविषयक संस्थेने चालवावा. ते परिणामकारकपणे खटला चालवून मला न्याय मिळवून देतील, अशी खात्री आहे,' असे पीडितेने पोलीस आयुक्तांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे. परंतु, पोलिसांनी ॲड. मिसार यांचे नाव पाठविले आहे.

# अल्पवयीन मेहुणीवर बलात्कार प्रकरणात जामीन

पुणे । प्रतिनिधी

अल्पवयीन मेव्हणीवर बलात्कार करणाऱ्याला विशेष न्यायालयाने जामीन मंजुर केला आहे. त्याच्यावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात आरोपीतर्फे ड. राकेश सोनार यांनी न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. याबाबत वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे डिसेंबर २०२४ गुन्हा दाखल झाला होता.

आरोपीने अल्पवयीन मेहुणीला लग्नाची आमिष दाखवून वारंवार जवळीक करून तिला मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तिच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला त्याला अटक केली असून, तो न्यायालयीन कोठडीत होता.

आरोपीची बाजू मांडताना ॲड. राकेश सोनार यांनी न्यायालयासमोर निदर्शनास आणून दिले की, हा गुन्हा वैवाहिक कलाहातून दाखल झाला आहे. मेहुणी ही आरोपीच्या घरी शैक्षणिक कारणासाठी राहत होती. त्या अल्पवयीन मेहुणीचा संपूर्ण खर्च हा स्वतः आरोपी करत होता. सदरच्या गुन्हा दाखल होण्याची तारीख पाहता व सदरची घटना पाहता यातील असलेला तफावत यावरून आरोपीच्या विरोधात खोटा दाखल केला केल्याचे दिसून येत आहे.

बचाव पक्षाच्या युक्तीवादानंतर न्यायालयाने ५० हजाराच्या जातमुचालक्यावर व फिर्यादी, साक्षीदार यांच्यावर कोणतेही दबाव न आणण्याच्या अटीवर हा निकला दिला. या प्रकरणात ड. राकेश सोनार यांना हर्षवर्धन रेपे , शाक्य सुवी, ऋत्विक जाधव, ॲड. अविनाश खुडे, ॲड. प्रियांका यादव यांनी सहकार्य केले.

# धंगेकरांचा चौथा पक्ष बदल; दर आठ दहा वर्षांनी पक्षांतरे; 'या' नेत्यांसोबत बसावे लागणार

पुणे: रवीन्द्र धंगेकर हे तरूण वयात शिवसेनेचे पुण्यातील नगरसेवक बनले आणि दहा वर्षे ते बाळासाहेब ठाकरेंसोबत राहिले. जेंव्हा बाळासाहेबांची साथ सोडून राज ठाकरे बाहेर पडले तेंव्हा धंगेकर हे मनसेत गेले. तिथून ते पुणे मनपाचे नगरसेवक बनले. २००९ व २०१४ ची विधानसबेची निवडणूक धंगेकरांनी इंजिनावर ,कसाबा पेठ विधानसभा मतदारसंघातून, लढवली. पण गिरीश बापटांपुढे त्यांचा निभाव लागला नाही.



मग ते मनसे सोडून बाहेर पडले आणि कसब्यातून पुणे महापालिकेत अपक्ष म्हणून दाखल झाले. तिथे त्यांनी काँग्रेसचे सहयोगी सदस्यत्व स्वीकारले. नंतर ते रीतसर काँग्रेसमध्ये दखलही झाले. २०१७ ते आता पर्यंत काँग्रेसमध्ये राहिलेल्या धंगेकरांनी पुन्हा एकदा धनुष्य बाण हाती घेतला आहे. पण ते या वेळी एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात दाखल होत आहेत.

धंगेकरांनी या आधी दर आठ दहा वर्षांनी पक्षांतरे केली आहेत. ते आता चौथ्या पक्षात येत आहेत. इथे ते काय करतात, किती टिकतात याकडे आता पुणेकरांचे लक्ष लागले असेल. गिरीश बापट यांनी लोकसभा लढवल्या नंतर त्यांच्या जागी पक्षाने २०१९ मध्ये मुक्ता टिळक यांना संधी दिली. दुर्दैवाने टिळकताई दुर्धर आजाराला बळी पडल्या. त्यांच्या रिक्त जागेसाठी पोट निवडणूक लागली तेंव्हा भाजपाने टिळक व बापट कुटंबियांना डावलून हेमंत रासनेंना संधी दिली. बापट टिळकांच्या समर्थकांना ते आवडले नव्हते, हे कसबा विधासनभा पोट निवडणुकीच्या निकालाने दिसले.

ती पोट निवडणूक जिंकून धंगेकर हे काँग्रेससाठी मोठेच हीरो ठरले. कारण १९९५ पासूनची २८ वर्षांची भाजपाची सलग विजयी मालिका धंगेकरांनी तोडून दाखवली होती. सहाजिकच २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अनंत गाडगिळांना डावलून काँग्रेस श्रेष्ठींनी धंगेकरांना लढण्याची संधी दिली. पण मुरलीधर अण्णा मोहोळ यांचा पराभव करणे ही धंगेकर व काँग्रेसाठी अवघड गोष्ट ठरली. पुढे सहा महिन्यांनी झालेल्या कसबा विधानसभेच्या २०२४ च्या निवडणुकीतही धंगेकरांनी हाताच्या चिन्हावर तिकीट मिळवले. पण भाजपाच्या हेमंत रासनेंनी ९० हजार मते घेतली. धंगेकरांना सत्तर हजार मतांवरच समाधान मानावे लागले.

पुणे लोकसभा निवडणुकीत रवीन्द्र धंगेकरांचा पराभव जवळपास सव्वा लाखांच् फरकाने केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केला. त्या निवडणुकीत धंगेकरांनी हवा मात्र जोरदार तयार केली होती. काँग्रेसची मते २०१९ च्या निवडणुकीच्या मानाने १२ टक्क्यांनी वाढली खरी, पण धंगेकरांच्या कसबा मतदार संघातही आघाडी घेता आली नाही. अर्थात २०१९ च्या निवडणुकीत मोहन जोशींचा पराभव तब्बल ३.२४ लाखांच्या फरकाने कै. गिरीश बापटांनी केला होता. त्या मानाने धंगेकरांच्या पराभवाचे कौतुकच करावे लागेल!

# आरटीई प्रवेशासाठी खोटा रहिवासी पुरावा अन् कागदपत्रे; १८ पालकांवर गुन्हा, पुण्यातील भुगावातील खळबळजनक प्रकार

**पुणे। प्रतिनिधी**

शिक्षणाचा हक्क कायदा अर्थात आरटीईचा लाभ घेणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. तुम्ही तुमच्या पाल्यांना आरटीईद्वारे प्रवेश घेत असताना बनावट कागदपत्रे जोडणार असाल तर आता पालकांवर थेट गुन्हे दाखल केले जात आहेत. पुण्यात अशा अठरा पालकांविरोधात बावधन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदवले आहेत. शिक्षण विभागाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. हा प्रकार जानेवारी २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत माताळवाडी भूगाव येथे घडला आहे. पालकांनी पाल्यांना 'आरटीई'अंतर्गत प्रवेश घेण्यासाठी रहिवासी पुरावा म्हणून बनावट कागदपत्रे सादर केली आहेत. मात्र, शिक्षण विभागाने केलेल्या छाननीमध्ये या पालकांचे बिंग फुटले आहे. त्यानंतर शिक्षण विभागाकडून



संबंधित पालकांवर खोटी माहिती दिल्या प्रकरणी आणि शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बावधन पोलीस पुढील तपास करत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सचिन चंद्रकांत भोसले (३४), खंडू दिलीप बिरादार (३३), रामकृष्ण तानाजी चोंधे (४०), सुमित सुरेश इंगवले (३४), विजय सुभाष जोजारे (३४), मंगेश गुलाब काळभोर (४३), रोहिदास मारुती कोंढाळकर (३६), श्रीधर बाबुराव नागुरे (३८), बाबासाहेब छबुराव रंधे (४०), विलास रामदास साळुंखे (३४), गणेश राजाराम सांगळे (३५), रुपेश बाळकृष्ण सावंत (३८), दिगंबर पंडित सावंत (४०), चंदन अंकुश शेलार (४४), कुंभराम सांगिलाल सुतार (३३), मंगेश झगुलाल गुरव (३३), विवेक जयवंत जोरी (३०), उमेश हिरामण शेडगे (४०) अशी गुन्हा दाखल झालेल्या पालकांची नावे आहेत.

कशी केली फसवणूक

आरोपी पालकांनी त्यांच्या पाल्यांना आरटीई मधील प्रवेशासाठी खोटा रहिवासी पुरावा सादर केला होता. शिक्षण विभागाने केलेल्या छाननीमध्ये हा प्रकार उघडकीस आला आहे. त्यानंतर शिक्षण विभागाकडून संबंधित पालकांवर खोटी माहिती दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मुळशीच्या गट शिक्षण अधिकारी सुजाता देशमाने यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार १८ पालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुळशी तालुक्यातील काही बड्या खासगी शाळांमध्ये आरटीई अंतर्गत सुमारे ९५० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. शिक्षण विभागाने केलेल्या छाननीमध्ये १८ आरोपी पालकांनी त्यांच्या पाल्यांचा खोटा रहिवासी पुरावा सादर करून २५ टक्के अंतर्गत प्रवेश घेतल्याचे समोर आले. बावधन पोलीस तपास करीत आहेत.